सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गेले दशक हे भारताच्या पायाभूत सुविधांचे दशक ठरले : पंतप्रधान

## राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त बिहारमध्ये १३,४८० कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या विकासकामांचा शुभारंभ

पाटणा, २४ एप्रिल – मागील दशक हे भारतासाठी पायाभूत सुविधा विकासाचे दशक ठरले. या आधुनिक पायाभूत सुविधा विकसित भारताचा पाया मजबूत करत आहे, असे विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पहिल्यांदाच ग्रामीण भागांतील १२ कोटींपेक्षा जास्त कुटुंबांना त्यांच्या घरात नळाद्वारे पाण्याची जोडणी मिळाली आहे, २.५ कोटींपेक्षा जास्त घरांमध्ये वीजेची सुविधा पोहोचली आहे आणि ज्यांनी कधीही गॅसच्या शेगडीवर स्वयंपाक करता येईल असा विचारही केला नव्हता, अशांना आता गॅस सिलेंडर मिळाले आहेत, ही बाब त्यांनी अधोरेखित केली. मूलभूत सुविधा पुरवणेही कठीण असलेल्या लडाख आणि सियाचीनसारख्या दुर्गम भागातही आता ४ऋ आणि ५ऋ मोबाईल जोडणी स्थापित झाली असल्याचे त्यांनी सांगितले. यातून देशाचे सध्याचे प्राधान्यक्रम दिसून येतात असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पंचायती राज दिनानिमित्त आज बिहारमध्ये मधुबनी येथे १३,४८० कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण केले. पंतप्रधान म्हणाले की पंचायती राज दिनानिमित्त संपूर्ण देश मिथिला आणि बिहारशी जोडला गेला आहे. बिहारच्या विकासाचे उद्दिष्ट असलेल्या हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन तसेच पायाभरणी झाली आहे असे सांगून पंतप्रधानांनी वीजनिर्मिती, रेल्वे तसेच पायाभूत सुविधा क्षेत्रांतील या उपक्रमांमुळे बिहारमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील हे आवर्जून नमूद केले. महान कवी आणि राष्ट्रीय पातळीवरील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व असलेल्या रामधारी सिंह दिनकर जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोदी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

या बिहारच्या भूमीवरच महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाच्या संकल्पनेचा विस्तार केला अशी टिप्पणी करत पंतप्रधान मोदी यांनी भारतातील गावे जेव्हा सशक्त होतील तेव्हाच देशाचा विकास वेगाने होईल यावर गांधीजींना असलेला अढळ विश्वास अधोरेखित केला. याच भावनेतून पंचायती राज संकल्पना रुजली आहे हे सांगण्यावर त्यांनी अधिक भर दिला. गेल्या दशकभरात पंचायतींना सक्षम करण्यासाठी सातत्याने पावले उचलण्यात येत आहेत. तंत्रज्ञानाने पंचायतींना बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून गेल्या दहा वर्षांत २ लाखांहून अधिक ग्रामपंचायती इंटरनेटशी जोडल्या



गेल्या आहेत, ते पुढे म्हणाले. पंचायतींच्या डिजिटलीकरणामुळे जीवन आणि मृत्यू प्रमाणपत्र तसेच जमीन मालकी प्रमाणपत्र यांसारखे दस्तावेज सुलभतेने प्राप्त होण्यासारखे अनेक अतिरिक्त फायदे झाले आहेत हे अधोरेखित करून पंतप्रधान मोदी यांनी, गावांमध्ये साडेपाच लाखांहून अधिक सामान्य सेवा केंद्रे कार्यरत झाली आहेत याकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. ते म्हणाले की स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटल्यावर आता देशाला नवे संसद भवन मिळाले असून, देशभरात ३०,००० नव्या पंचायत भवनांची देखील उभारणी करण्यात आली आहे. पंचायतींना पुरेसा निधी प्राप्त होत आहे याची सुनिश्चिती करून घेण्याला सरकार नेहमीच प्राधान्य देत आहे हे देखील त्यांनी अधोरेखित केले. गेल्या दशकभरात पंचायतींना २ लाख कोटी रुपयांहून अधिक निधी मिळाला असून हा सर्व निधी गावांच्या विकासासाठी वापरण्यात आला आहे, पंतप्रधान म्हणाले.

ग्रामपंचायतींना भेडसावणारी एक प्रमुख समस्या जमिनीच्या वादाशी निगडित आहे, याकडे लक्ष वेधत, एखादी जमीन निवासी आहे, की कृषी, पंचायतीच्या मालकीची आहे, अथवा सरकारी मालकीची, यावरून वारंवार मतभेद होत असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी जमिनीच्या नोंदींचे डिजिटायझेशन करण्यात येत असून, त्यामुळे अनावश्यक विवाद प्रभावीपणे सोडवण्यात सहाय्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

पंचायतींनी सामाजिक सहभाग बळकट केल्याचे नमूद करून, पंचायतींमध्ये महिलांना ५०% आरक्षण देणारे बिहार हे देशातील पहिले राज्य ठरल्याचे मोदी यांनी अधोरेखित केले. बिहारमध्ये आज आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दलित, महादलित, मागास आणि अतिमागास समाजातील महिला लक्षणीय संख्येने लोकप्रतिनिधी म्हणून काम करत आहेत, हा खरा सामाजिक न्याय आणि सामाजिक सहभाग असल्याचे त्यांनी नमूद केले. अधिकाधिक सहभागाने लोकशाहीचा विकास आणि बळकटीकरण होते, असे त्यांनी अधोरेखित केले. या दृष्टिकोनावर बोलताना ते म्हणाले की, लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देणारा कायदाही लागू करण्यात आला आहे. सर्व राज्यांमधील महिलांना याचा लाभ मिळेल आणि आपल्या भगिनी आणि कन्यांना अधिक प्रतिनिधित्व मिळेल, असे ते म्हणाले.

महिलांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि त्यांच्यासाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी सरकार मिशन मोडमध्ये काम करत आहे, यावर भर देत, बिहारमधील 'जीविका दीदी' या परिवर्तनकारी कार्यक्रमाच्या प्रभावाने अनेक महिलांच्या जीवनात बदल घडवल्याचे मोदी यांनी अधोरेखित केले. बिहारमधील महिला बचत गटांना आज सुमारे एक हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ मिळेल, आणि देशभरात ३ कोटी लखपती दीदी निर्माण करण्याच्या उद्दिष्टाला हातभार लागेल, असे ते म्हणाले.

गेल्या दशकभरात ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती मिळाल्याचे त्यांनी अधोरेखित केले. गरिबांसाठी घरे, रस्ते, गॅस जोडणी, पाणी जोडणी, शौचालये बांधून ग्रामीण भागासाठी लाखो कोटी रुपये खर्च करण्यात आले, याकडे त्यांनी लक्ष वेधले. ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या असून, मजूर, शेतकरी, वाहन चालक आणि दुकानदारांना त्याचा लाभ मिळाला आहे, आणि त्यांच्यासाठी उत्पन्नाचे नवे स्रोत खुले झाले आहेत, असे पंतप्रधान म्हणाले. विशेषतः, पिढ्यानपिढ्या वंचित राहिलेल्या समुदायांना याचा लाभ मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

# सिल्लोड आगारात पाच आधुनिक बसेस दाखल

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२४, आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड आगारात दाखल झालेल्या नवीन ५ अत्याधुनिक बस चे लोकार्पण माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.

आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड आगरासाठी १० अत्याधुनिक बस मंजूर झालेल्या असून त्यातील ५ बसेस आज सिल्लोड आगरास प्राप्त झाले. उर्वरित बसेस लवकरच सिल्लोड आगारात दाखल होणार असल्याची माहिती अब्दुल समीर यांनी यावेळी बोलतांना दिली. नवीन अत्याधुनिक बससेवा अधिक सुरक्षित, आरामदायक आणि पर्यावरण पूरक प्रवासाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे साद्या दरात या बसने



प्रवास करता येणार असल्याने प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन अब्दुल समीर यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी नवीन बसमधून शहरात फेरी मारली. नवीन बस अतिशय आरामदायी असल्याची प्रतिक्रिया यावेळी अब्दुल समीर यांनी यावेळी दिली. दाखल झालेल्या नवीन बस मुळे प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. याबद्दल अब्दुल समीर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आ.अब्दुल सत्तार यांचे आभार मानले.

सिल्लोड आणि सोयगाव आगाराला नवीन बस मिळाव्यात तसेच दोन्ही बस स्थानकात विकास कामे करणे व प्रवाशांना अधिकाधिक सुविधा देण्यासंदर्भात दिनांक १८ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे आ. अब्दुल सत्तार व परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली होती. सिल्लोड व सोयगाव आगारास प्रत्येकी २० नवीन बसेसची उपलब्धता करून देण्याची मागणी आ. अब्दुल सत्तार यांनी केली होती. त्यानुसार मंत्री प्रताप सरनाईक यांनी सिल्लोड आगरासाठी तात्काळ १० बसेस प्राथमिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. त्यातील पाच बसेस आज सिल्लोड आगारास उपलब्ध झालेल्या आहेत. त्याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आगार प्रमुख विजय काळवणे यांनी केले. सूत्रसंचालन सुनील जैस्वाल यांनी तर शेवटी वाहक बद्रीनाथ भालगडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, तालुकाप्रमुख मारोती पा. वराडे, माजी नगरसेवक रउफ बागवान, विठ्ठल सपकाळ, शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शेख सलीम हुसेन, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, आगार प्रमुख विजय काळवणे, स्थानक प्रमुख विकास चव्हाण, वाहतूक निरीक्षक किरण औसरमल, कृष्णा कावले, वाहतूक निरीक्षक सरफराश पठाण, राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे सल्लागार शेख इम्रान ( गुड्डू ) , शाखा अध्यक्ष हरी शेळके, सचिव गजानन केनेकर, रुग्णकल्याण समितीचे हाजी मोहमद हनिफ, मानसिंग राजपूत, राजेश्वर आरके, शेख वसीम, मनोहर आरके, सुनील पांडुरंग दुधे, भावराव दुधे, धम्मा दांडगे, फहिम पठाण आदींची उपस्थिती होती.

# भारताकडून पाकिस्तानी नागरिकांचे सर्व प्रकारचे व्हिसा रद्द, देश सोडण्याचे आदेश

## पाकिस्तानात गेलेल्या भारतीयांनाही लवकरात लवकर परतण्याचा सल्ला

नवी दिल्ली, २४ एप्रिल – जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. त्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने गुरुवारी पाकिस्तानी नागरिकांचे सर्व प्रकारचे व्हिसा रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच २७ एप्रिलपर्यंत देश सोडण्यास सांगितले आहे. मात्र वैद्यकीय व्हिसाची मुदत दोन दिवस वाढवण्याची सूचनाही देण्यात आली, त्यामुळे सदर व्हिसा २९ एप्रिलपर्यंतच वैध असणार आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने अटारी–वाघा सीमेवरील चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. दरम्यान, भोपाळमधील एका कुटुंबाला, जे



त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी पाकिस्तानला जाण्यासाठी अटारी–वाघा सीमेवर पोहोचले होते, त्यांना सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) परत पाठवले आहे.

दरम्यान परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने भारत सरकारने पाकिस्तानी नागरिकांसाठी व्हिसा सेवा तात्काळ प्रभावाने स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तर मंत्रालयाने पाकिस्तानमधील भारतीय नागरिकांनीही लवकरात लवकर परतण्याचा सल्ला दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले की, जे पाकिस्तांनी नागरिक सध्या भारतात वास्तव्यास आहेत त्यांनी व्हिसाची मुदत संपण्यापूर्वी भारत सोडावा.

# जुन्या वादातून तीस वर्षीय इसमाचा दगडाने ठेचून खून

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ एप्रिल – तालुक्यातील चापानेर तांडा शिवारात दिनांक २३ रोजी बाजरीचे शेतामध्ये अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला होता

बळीराम रावसाहेब राठोड (वय ३० रा .चापानेर तांडा) असे मृत तरुणाचे नाव आहे दि. २३ एप्रिल बुधवार रोजी दुपारी २:०० वाजता चापानेर –बोलठेक रस्त्यावरील राहूल भाडाईत यांच्या बाजरी पिकाच्या शेतात दगडाने ठेचलेला एका तरुणाचा मृतदेह आढळल्याचे पोलिसांना माहिती मिळाली पोलिसांनी अधिक माहिती घेतली असता बळीराम



राठोड रा. चापानेर तांडा अशी या तरुणाची ओळख पटली दि.२४ रोजी वासुदेव रावसाहेब राठोड वय ३५ वर्षे,रा.शेत गट नं ३३३, चापानेर शिवार, (चापानेरतांडा) ता.कन्नड यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला

पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपी आकाश भाऊसाहेब राठोड रा.शेत गट नं ३३३, चापानेर शिवार,(चापानेरतांडा) याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून कन्नड ग्रामीण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे हा खून जुन्या किरकोळ वादातून हा करण्यात आला आहे

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड,सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार, घटनास्थळी दाखल झाले

अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार हे करत आहेत.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणीमध्ये थायलंडच्या पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २४ जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत आग्या मोहळाच्या मधमाश्यांचे सत्र सुरूच आहे.दि ५ एप्रिल रोजी कर्नाटक येथील शालेय विद्यार्थ्यांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना ताजी असतानाच मंगळवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास थायलंड येथील ४० पर्यटकांच्या ग्रूपवर लेणी क्रमांक २६ समोरील आग्या मोहळाच्या मधमाशांनी हल्ला चढविला यात एक विदेशी महिला पर्यटक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

सध्या परिसरात तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअस पलीकडे गेला आहे.अजिंठा लेणी परिसरात पाण्याच्या शोधात मधमाश्या फिरत असतात.यामुळे पर्यटकांवर हल्ल्याचे प्रमाण अधिक वाढत आहे.लेणी क्रमांक २६ समोरील आग्या मोहळाच्या मधमाशांनी मंगळवारी सायंकाळी थायलंड येथील पर्यटकांवर अचानक हल्ला चढवला. जीव वाचविण्याच्या आकांताने आरडाओरड करत उपस्थित सर्व पर्यटक सैरावैरा पळू लागले .भारतीय पुरातत्व विभागाच्या



कर्मचाऱ्यांनी मधमाश्यापासून बचाव करण्यासाठी प्रयत्न केले.मात्र तोपर्यंत थायलंड येथील एका महिला पर्यटकावर मधमाशांनी चावा घेत गंभीर जखमी केले.यात ही महिला बेशुद्ध अवस्थेत पडली होती. जखमी महिलेला जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज प्रतिष्ठानच्या रुग्णवाहिकेतून अजिंठा येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.

यापूर्वीही ७ फेब्रुवारी,२३ मार्च व ४ एप्रिल रोजी मधमाशांच्या हल्ल्यात देशी विदेशी पर्यटकांसह शालेय विद्यार्थी गंभीर जखमी झाले होते.मात्र पुरातत्त्व विभाग आग्या मोहळाचा बंदोबस्त करण्याच्या बाबतीत झोपेचे सोंग तर घेत नाही ना अशी संतप्त प्रतिक्रिया पर्यटकांमधून उमटत आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी झाली आहे. त्यातच अश्या घटना घडल्यानंतर पर्यटक येथील शॉपिंग प्लाझा मध्ये खरेदी न करता सरळ निघून जात आहे.परिणामी,येथील व्यवसायावर या गोष्टीचा परिणाम होत आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षण कालावधीत वाढ

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता राज्यशासनाने सुरु केलेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी ६ महिनेवरुन ११ महिने करणेस शासनाने मान्यता प्रदान केली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशा प्रशिक्षणार्थींनी पुढील पाच महिण्यासाठी संबंधित आस्थापनेत रुजू व्हायचे आहे. या वाढीव ५ महिन्यांच्या कालावधीसाटी कार्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक उमेदवारांनी त्यांची आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवासी प्रमाणपत्र व जन्म दाखला प्रमाणपत्र इ. पडताळणी https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या पोर्टलवर करावी. योजनेअंतर्गत ज्या उमेदवाराचा ६ महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे. अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी संबंधित आस्थापनेत दि.३० एप्रिल २०२५ पर्यंत रुजू व्हावे तसेच संबंधित आस्थापनांनी कार्य प्रशिक्षणार्थ्यांना रुजू करुन घ्यावे, असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

# अपत्यप्राप्तीसाठी जागतिक दर्जाच्या देखभालीसह परवडण्याजोग्या उपाययोजना

नागपूर : आपलं कुटुंब वाढवणं हा व्यक्तीच्या आयुष्यातली एक अतिशय व्यक्तिगत आणि भावनिक टप्पा असतो. तरीही आज २.५ कोटींहून अधिक भारतीय वंध्यत्वाच्या समस्येशी झगडत असताना, जी गोष्ट एकेकाळी नैसर्गिकरित्या घडून येणारे संक्रमण होती, ती आता वैद्यकीय क्षेत्राच्या मदतीने, काळजीपूर्वक आखलेली प्रक्रिया बनली आहे, ज्यासाठी सुस्पष्टता, सहानुभाव आणि योग्य देखभालीची उपलब्धता या गोष्टींची गरज आहे. अशी माहिती डॉ. प्रियंका शहाणे, फर्टिलिटी स्पेशलिस्ट, बिर्ला फर्टिलिटी अँड आयव्हीएफ, नागपूर यांनी दिली.

त्या पुढे म्हणाल्या गेल्या अनेक वर्षांत प्रजनन स्वास्थ्याविषयीची चर्चा अधिकाधिक प्रगल्भ झाली आहे, मात्र या सेवेची उपलब्धता हे अद्यापही एक आव्हान आहे. अज्ञानापासून ते समाजामध्ये याबद्दल बाळगल्या जाणाऱ्या मौनापर्यंत, किंमतींबाबतची संदिग्धता ते उपचारांसाठी अवलंबण्यात येणारे गुंतागूंतीचे, अनाकलनीय मार्ग या साऱ्यामधून वाट दाखविणारे कुणी नसेल तर जोडप्यांना वाट हरवल्यासारखे वाटू शकते.

जागतिक दर्जाच्या फर्टिलिटी सेवेची खरी किंमत :

सध्याच्या काळात अपत्यप्राप्तीसाठीचे अर्थात फर्टिलिटीचे उपचार म्हणजे फक्त आयव्हीएफ हे समीकरण उरलेले नाही. या उपचारांत हार्मोन्सच्या मूल्यमापनापासून ते जनुकीय विश्लेषणापर्यंत ते दोष दूर करणाऱ्या म्हणजे करेक्टिव्ह प्रक्रिया, भ्रूणाचे जतन करण्यासाठीच्या एम्ब्रियो क्रायोप्रिझर्व्हेशनच्या प्रक्रियेपासून ते एआयद्वारे उपचारांचे नियोजन करण्यापर्यंत वैयक्तीकृत सेवांच्या संपूर्ण श्रेणीचा समावेश झाला आहे. यात प्रगत निदानशास्त्र, अत्याधुनिक लॅबोरेटरी आणि तंत्रज्ञान व अनेक वर्षांपासून जमा केलेल्या चिकित्सात्मक कौशल्याचा मेळ साधला जात आहे.

अजूनही वय हा आयव्हीएफचे यशापयश ठरविणारा सर्वात मोठा घटक आहे. सर्वसाधारणपणे ३५ वर्षांखालील स्त्रीला स्टिम्युलेशनला सुधारित प्रतिसाद मिळत असल्याचे अनुभवास येते व अधिक यशस्वी परिणाम मिळतात. मात्र अलीकडच्या काळात अधिकाधिक जोडपी नोकरीच्या जबाबदाऱ्या, उशीर झालेले लग्न किंवा प्रारंभिक लक्षणे लक्षात न येणे अशा कारणांमुळे आयुष्याच्या नंतरच्या टप्प्यात उपचार सुरू करत आहेत – अपत्यप्राप्तीच्या प्रयत्नांमध्ये बायोलॉजिकल घड्याळ अखंड टिकटिक करत असते असे म्हणतात ते खोटे नाही.

योग्य निर्णय :

फर्टिलिटी क्लिनिकची निवड करताना, या क्लिनिक्सच्या जाहिरातीत सांगितल्या जाणाऱ्या यशाच्या टक्केवारीच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे आणि काही महत्त्वाचे प्रश्न विचारले पाहिजेत, जसे की:

त्यांच्याकडे इत्यंभूत निदान यंत्रणा आणि सर्जिकल केअर हे सारे एकाच छताखाली उपलब्ध आहे का?

उपचार सुरू केल्यानंतर अतिरिक्त खर्च उघड न करता, या उपचारांसाठी होणाऱ्या एकूण खर्चाची ते तुम्हाला सुरुवातीलाच स्पष्ट कल्पना देत आहेत का?



# सट्टा खेळणारावर कारवाई, सत्ताधारी असलेल्या बुक्की चालकाला मात्र मिळाले अभय!

**आयपीएल क्रिकेट सट्टा भाग -५**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आयपीएल क्रिकेट सामने सुरू आहेत.या सामन्यामध्ये मंठा शहरात व ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात सट्टा लावल्या जात आहे.दैनिक तरुण भारत मध्ये आम्ही गेल्या आठवड्यापासून आयपीएलचे सत्र सुरू केले आहे.या पार्श्वभूमीवर मंठा मध्ये आयपीएल सट्टा खेळणारा वर कारवाई केली आहे. परंतु बुकी चालक मात्र आणखीनही मोकाट आहे. खेळणारवर कारवाई आणि बुक्की चालक मालामाल होताना दिसून येत आहे.

मंठा शहरामध्ये व्हाईट कॉलर मधील सत्ताधारी पक्षातील बुक्की चालक आयपीएलच्या क्रिकेट सामन्यांमध्ये आपले फंटर च्या माध्यमातून शहरात सट्टा घेतात. या सट्ट्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले असून अनेकांना शहर सोडून जाण्याची वेळ आली आहे. मागील वर्षी दहा ते पंधरा जणांनी या सट्ट्यावरच्या पैशापायी गाव सोडले. तर काहीजणांना बाहेर कामाला जायची वेळ आली आहे. तर काही जणांनी आत्महत्या देखील केली आहे. शहरामध्ये अत्यंत परिस्थिती बिकट झालेली असून सट्टा बुक्की चालकावर कार्यवाही करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे. सट्टा बुक्की चालक यांच्यावर कारवाई होत नसून जे सट्टा खेळतात त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. सट्टा खेळणारा वर कारवाई करण्यात आली त्यांच्या मोबाईल मध्ये बुकी चालकाचे नंबर आहेत. त्यांना विचारणा केल्यावर बुक्की चालकही गळाला लागेल परंतु तसे न करता त्याला अभय देण्याचे काम होताना दिसून येत आहे.



प्रशासनाच्या या धोरणामुळे सट्टा बुक्की चालक कोट्यावधीची उलाढाल करून मालामाल होतांना दिसून येत आहेत. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक साहेबांनी लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा ड्रीम प्रोजेक्ट अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मराठवाडा आणि लगतच्या विदर्भातील उद्योग, व्यापार व शेतकऱ्यांना देशांतर्गत तसेच परदेशांत मालाची सहजपणे अतिशय स्वस्त दरांत वाहतूक व्यवस्था असलेल्या ड्रायपोर्ट मल्टीमोड लॉजिस्टीक पार्क चे प्रत्यक्ष कामकाजाची माहिती आणि ड्रायपोर्ट परिसराला जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी व शेतकऱ्यांनी बुधवारी दि.२३ रोजी भेट देऊन पाहणी केली.

रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या सभागृहात आयोजित बैठकीत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते भास्कर पाटील दानवे यांनी मराठवाड्यातील सर्व उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी ड्रायपोर्टचे प्रत्यक्ष कामकाज लवकरात लवकर सुरू होण्याची प्रतिक्षेत आहेत असे सांगून तो सुवर्ण क्षण उगवला आहे असे म्हटले हा प्रकल्प संपूर्ण मराठवाड्याचे चित्र बदलण्याची क्षमता असलेला आहे असे दानवेंनी सांगितले माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी या ड्रायपोर्टच्या उभारण्यात खूप प्रचंड मेहनत घेतली असून खर्या अर्थाने आता विकासाला गती मिळाली आहे असे ते म्हणाले. यावेळी जेष्ठ उद्योजक सुनील रायठठ्ठा, पोलाद स्टील चे संचालक नितीन काबरा, महीको चे संचालक रितेश मिश्रा, आयकॉन स्टील चे संचालक उषमेश राठी व अखिलेश राठी, कालिका स्टील चे संचालक गोविंद गोयल व गोपाल गोयल, लघुउद्योग भारती संघटनेचे अविनाश देशपांडे, नितीन बागडी, भारतीय जनता पक्षाचे महानगराध्यक्ष सतीश जाधव, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा संघठन मंत्री सिध्दीविनायक मुळे जिल्हा उपाध्यक्ष श्री.धनराज काबलीये मंडळ अध्यक्ष श्री.महेश निकम श्री.निवृत्ती लंके उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचलन अर्जुन गेही यांनी केले यावेळी राष्ट्रीय महामार्ग कार्पोरेशनचे उपाध्यक्ष राजकुमारसिंग चव्हाण, सहायक उपाध्यक्ष सुर्जितो मोहंतो आणि जालना ड्रायपोर्टचे टर्मिनल मॅनेजर विकास मलिक यांनी ड्रायपोर्ट संचलनासंदर्भात सविस्तर माहिती दिली उपस्थितांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

## संक्षिप्त

### पालकमंत्री मुंढे यांनी घेतला गौण खनिज विभाग आणि जल जीवन मिशन योजनेचा ऑनलाईन आढावा



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गौण खनिज विभाग आणि जल जीवन मिशन अंतर्गत जालना जिल्ह्यातील एकूण ७३३ पाणी पुरवठा योजनांच्या प्रगतीबाबतचा ऑनलाइन आढावा पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांनी आज घेतला.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंढे म्हणाल्या की, नुकतेच राज्यात सुधारित वाळू धोरण तयार करण्यात आले असून, त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी प्राधान्याने सोडवण्यात याव्यात, जेणेकरून जनतेला स्वस्त दरात वाळू उपलब्ध होईल. तसेच अन्य संबंधित विभागांशी समन्वय ठेवत जनतेला वाळू सहज उपलब्ध होईल या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. अनधिकृत वाळू उपसा आणि अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यावर कडक कारवाई करावी. जिल्ह्यातील सर्व डेपोची तपासणी करून तत्काळ इतर सर्व वाळू डेपो कार्यान्वितकरण्याच्या सूचना श्रीमती मुंढे यांनी यावेळी दिल्या.

जलजीवन मिशन योजनेचा आढावा घेताना पालकमंत्री श्रीमती मुंढे यांनी ज्या योजनांची प्रगती २५ टक्के पेक्षा कमी आहे अशा २४ योजनाची सविस्तर कारणे माहित करून घेतली. तसेच ज्या योजनांच्या कामाची प्रगती कमी आहे, अशा दोषी कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करावी. टंचाई कालावधी बघता जल जीवन मिशनच्या पूर्ण झालेल्या योजना मधून गावास सुरळीत पाणी सुरू ठेवणे बाबत सूचना त्यांनी केल्या. तसेच योजने अंतर्गत होणाऱ्या सर्व कामांची गुणवत्ता व दर्जा चांगला राहील याची दक्षता घ्यावी. कामाबाबत कोणतीही तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत वेळेत उचित कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंढे यांनी दिले. बैठकीस यावेळी जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन नम्रता चाटे, गौण खनिज अधिकारी तुषार निकम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आदींची उपस्थिती होती.

### गोळीबार प्रकरणातील आरोपी बाळासाहेब मस्के गोंदी पोलीसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील गोद्री पोलीस ठाण्यांतर्गत आरोपी नामे बाळासाहेब भगवान मस्के वय ३६ वर्षे रा. रेवकी देवकी ता. गेवराई जिल्हा बीड व त्याचा मित्र जखमी नामे तात्या ऊर्फ कबीर प्रकाश सोनवणे वय २७ वर्षे रा. आंगर नांदुर ता. गेवराई जिल्हा बीड हे आरोपी बाळासाहेब मस्के यांचे एम जी ग्लोस्टर वाहन क्रमांक एम एच १२ टी डी ००९९ ही मध्ये सोलापुर छत्रपती संभाजीनगर एन एच ५२ हायवेवरुन छत्रपती संभाजीनगर कडे जात असताना पैठण फाटा शहागंड या ठिकाणी यातील आरोपी बाळासाहेब मस्के यांने त्याचे कडील अवैध पीस्टल ने तात्या ऊर्फ कबीर प्रकाश सोनवणे यास गोळी मारुन जखमी केले होते सदर घटने बाबत जखमीचे वडील प्रकाश कोडींबा सोनवणे यांचे फिर्यादी वरुन गोंदी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३७७/२०२४ कलम १०९,३ (५) भारतीय न्याय संहिता सह कलम ३/२५ शस्त्र अधिनियम प्रमाणे दिनांक १५/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर प्रभारी अधिकारी गोंदी पोलीस स्टेशन यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन गुन्हयातील आरोपी नामे बाळासाहेब भगवान मस्के याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करुन आरोपीस दिनांक १७/०४/२०२५ रोजी आरोपीस अटक करुन आरोपीस मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता आरोपीची ३ दिवस पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे यापुर्वी गेवराई पोस्टे येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक श्री अजय कुमार बन्सल सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपाणी सो, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड श्री विशाल खांबे सो, यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष श्रीनिवास खांडेकर यांनी केला असुन त्यांना तपास दरम्यान पोउपनि आय एम शेख, पोउपनि किरण हावले, पोहेकॉ १५६३ अशोक नागरगोजे, पोहेकॉ/०८ केंद्रे, पोकॉ/१७ भोजने, पोकॉ/१४ सिध्दीकी सर्व गोंदी पोलीस स्टेशन यांनी मदत केली आहे

# इच्छुकांचा हिरमोड: मातब्बरांचे स्वप्न भंगले; सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**




मंठा तालुक्यातील ९२ ग्राम पंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत ता.२१ सोमवार रोजी येथील तहसील कार्यालयात पार पडली. यावेळी तहसीलदार सोनाली जोंधळे, नायब तहसीलदार संजय शिंदे, काळदाते, सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती, मंडळ अधिकारी श्रीकांत गादेवाड यांच्यासह निवडणूक विभागातील कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीच्या हालचाली सुरू आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच आरक्षण जनगणना २०११ च्या लोकसंख्येनुसार टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने चक्रानुक्रमे घोषित करण्यात आले.

# स्थानिक गुन्हे शाखा व दहशतवाद विरोधी शाखेने पकडला ८५ किलो गांज्या

## २९ लाखांचा मुद्देमाल जप्त!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी जालना जिल्हयात अंमली पदार्थ विक्री करणारे इसमांविरुध्द कार्यवाही करण्याचे सुचना दिल्या होत्या. दिनांक २३/०४/२०२५ रोजी जालना शहरातुन छत्रपती संभाजीनगर कडे एका MH / 16 / -T / 8302 या कार मधुन तीघेजण अंमली पदार्थ गांजाची अवैध वाहतुक करणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती.त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखा व दहशतवाद विरोधी शाखा जालना यांनी संयुक्त कारवाई करुन आरोपी नामे १) विजय अशोक गाढे वय ४० वर्ष रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर २) अमोल व्दारकादास चांदणे वय ३२ वर्ष रा.रुई ता. अंबड जि. जालना ३) बाबासाहेब पंढरीनाथ मुंजवार वय ३६ वर्ष रा. भार्डी ता. अंबड जि. जालना यांचे ताब्यातुन एकुण ८५ किलो ६४० ग्रॅम गांजा व गुन्हयात वापरलेले वाहन व ०४ मोबाईल असा एकुण २८,९३,०००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोउपनि बाबासाहेब खार्डे दहशतवाद विरोधी शाखा जालना यांचे तक्रारी वरुन नमुद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे चंदनझिरा हे करीत आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, श्री. अनंत कुलकर्णी उपविपो. अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोउपनि बाबासाहेब खार्डे, पोउपनि.यासिन, शेख अख्तर, पोहेकॉ/ मारोती शिवरकर, विनोद गडदे, कैलास कुरेवाड जालना,स्था.गु.शा.चे रुस्तुम जैवाळ, रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशीक, सतीष श्रीवास, इरशाद पटेल, सचीन राऊत, कैलास चेके, चालक भरत कडुळे, सौरभ मुळे, गणेश वाघ (फोटोग्राफर) यांनी केली आहे.

# मोफत मिळणारी वाळू घेऊन जाण्याचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या आदेशानुसार येथील जिल्हा खनिकर्म अधिकारी जालना यांचे पत्रजा.क्र.२०२५/ मशाका/ गौख/ कावि यांचे पत्र दि.१६.०४.२०२५ अन्वये मौ. सावरखेडा वाळुडेपो मध्ये १२०३.७८ ब्रास वाळु शिल्लक असल्याने जिल्हास्तरीय वाळु संनियंत्रण समितीची झालेल्या बैठकमीध्ये वाळु डेपोना १५ दिवसासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे तसेच मा. मुख्यमंत्री यांचा १०० दिवस कृती आराखाडा अंतर्गत घरकुल व शासकीय कामासाठी वाळु उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयास कळविले आहे. त्याअनुषंगाने तालुक्यातील सर्व धरकुल लाभार्थी यांना आव्हान करण्यात येते की, घरकुल लाभार्थी यांना घरकुल बांधकामासाठी वाळुची आवश्यकता असल्यास गटविकास अधिकारी पंचायत समिती जाफ्राबाद/मुख्याधिकारी नगरपंचायत जाफ्राबाद यांचेकडे अर्ज करण्यात यावा घरकुल लाभार्थी महाखनिज पोर्टल वरुन मोबाईल नं व्दारे झिरो पास रॉयल्टी मिळेल आणि सदर पासेव्दारे वाहतुक खर्च वगळता ५ ब्रास विनामुल्य वाळु, मौ. सावरखेडा येथील वाळुडेपोमधुन मिळेल,तर ती घरकुल लाभार्थ्यांनी घेऊन जावे असे आव्हान जाफराबाद तालुका तहसीलदार यांनी केले आहे

# मंठा बाजार समितीचे संचालक सचिन राठोड यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



मंठा बाजार समितीचे संचालक तथा रेणुका महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गणेशराव राठोड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४७ वर्षे होते. मंगळवार ता. २२ रोजी नातेवाईकाच्या लग्नाला गेलेले असताना दुपारी साडेचार ते पाच वाजेच्या दरम्यान लग्न मंडपातच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मावळली. सचिन राठोड हे आमदार राजेश राठोड यांचे चुलत बंधू होते. दोन दिवसापूर्वीच सचिन राठोड यांचा वाढदिवस मित्रमंडळींनी साजरा केला होता. काही वर्ष ते उमरखेडा गावचे सरपंच राहिले. अत्यंत मितभाषी, संयमी स्वभावाचे ते असल्यामुळे त्यांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे. स्व. सचिन राठोड यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ व बहीण असा मोठा परिवार आहे. स्व. सचिन राठोड यांच्यावर बुधवार ता. २३ रोजी उमरखेडा या त्यांच्या मूळ गावी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गावासाठी काही पण! उपसरपंच शेखर श्रीवास्तव यांची प्रशंसनीय कृती, स्वतःच्या विहिरीतून गावाची भागवली तहान

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील टंचाईग्रस्त १५८ गावात ३० जुन २०२५ पर्यंत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उद्भवावर प्रतिकुल परिणाम करणाऱ्या विहिरीमधील पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज जारी केले आहेत. जिल्ह्यातील टंचाईग्रस्त १५८ गावामध्ये पारधचाही समावेश आहे दरम्यान भोकरदन तालुक्यातील पारध बू येथे एक प्रशंसनीय घटना घडली. गावातील पाणीटंचाई लक्षात घेता, उपसरपंच शेखर श्रीवास्तव यांनी 'गावासाठी काही पण' या उक्तीला प्रत्यक्षात उतरवले. त्यांनी स्वतःच्या विहिरीतून थेट सरकारी पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीत पाणी सोडले, ज्यामुळे गावकऱ्यांना तिसऱ्या दिवशी वेळेत पाणी मिळाले.

आज दिवसभर गावात सिंगल फेज विद्युत पुरवठा होता. त्यामुळे सरकारी पाणीपुरवठा योजनेवरील विद्युत पंप चालू शकत नव्हता. यामुळे गावकऱ्यांमध्ये पाण्याची चिंता वाढली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपसरपंच शेखर श्रीवास्तव यांनी तातडीने कार्यवाही केली. श्रीवास्तव यांनी तत्काळ विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यांनी अधिकाऱ्यांशी बोलून गावकऱ्यांची पाण्याची गरज लक्षात आणून दिली आणि काही काळासाठी थ्री फेज विद्युत पुरवठा सुरू करण्याची विनंती केली. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आणि अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्पुरता थ्री फेज पुरवठा सुरू केला. थ्री फेज पुरवठा सुरू होताच, शेखर श्रीवास्तव यांनी आपल्या खासगी विहिरीतील पाणी सरकारी योजनेच्या विहिरीत सोडण्यास सुरुवात केली. त्यांच्या या तत्परतेमुळे



गावकऱ्यांना वेळेत पाणी मिळू शकले. या कार्याबद्दल बोलताना काही गावकऱ्यांनी सांगितले की, आज आम्हाला पाण्याची खूप गरज होती. सिंगल फेजमुळे पंप चालू नव्हता आणि काय करावे हे सुचत नव्हते. अशा स्थितीत उपसरपंच श्रीवास्तव यांनी दाखवलेली तत्परता खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांनी 'गावासाठी काही पण' हे बोलून नाही तर कृतीतून दाखवून दिले आहे. उपसरपंच शेखर श्रीवास्तव यांच्या या कार्यामुळे गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. त्यांची ही कृती इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. गावात जेव्हा कोणतीही समस्या येते, तेव्हा लोकप्रतिनिधींनी अशाच प्रकारे पुढे येऊन काम करण्याची गरज आहे, हे शेखर श्रीवास्तव यांनी सिद्ध केले आहे.


पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास

# पाकिस्तानचा माज उतरवण्याची हीच खरी वेळ, भारतीय सैन्य पाकिस्तानला नक्की धडा शिकवेल -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारताचा स्वर्ग म्हणून संबोधल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी पाकिस्तानच्या दहशतवादी संघटनांकडून काल भीषण दहशतवादी हल्ला करण्यात आला. उन्हाळी सुट्टयांचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या. अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. जम्मू-काश्मीरमधील अलीकडच्या काळात झालेला हा सर्वात भीषण दहशतवादी हल्ला आहे. २६ पर्यटकांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. पहलगाम हे काश्मीरमधील पर्यटन स्थळ आहे. इथे नेहमीच पर्यटकांची गर्दी असते. काल दुपारी इथे मोठ्या संख्येने पर्यटक असताना हा दहशतवादी हल्ला झाला. पहलगामच्या सौंदर्याला काल रक्तरंजित करण्यात आलं.

देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी गृहमंत्री श्री अमित भाई शहा यांनी याबाबत कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. भारत सरकारच्या वतीने भारतीय सैन्याला आपले निर्णय स्वतः घेण्याची पूर्ण मुभा दिलेली आहेच परंतु याहीपेक्षा कठोरातील कठोर भूमिका घेऊन अतिरेक्यांना आणि अतिरेक्यांना आणि पाकिस्तानला अद्दल घडवण्याची हीच वेळ आहे. भारत सर्व दृष्टिकोनातून सक्षम असून या अतिरेकी हल्ल्याचा भारताकडून नक्कीच सर्जिकल स्ट्राइक सारखे उत्तर मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय सैन्यावर देशभक्त भारतीयांचा १००% विश्वास असल्याचे प्रतिक्रिया माजीमंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे.






# पहेलगाम हल्ल्याबाबत सर्व हिंदुत्ववादी संघटना तर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

छत्रपती संभाजीनगर - भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरच्या पहेलगाममध्ये दोन दिवसापूर्वी पाकिस्तानने पोसलेल्या जिहादी मुस्लिम अतिरेक्यांनी पर्यटनासाठी आलेल्या २७ निशस्त्र हिंदूवर नाव गाव धर्म विचारून गोळ्या घालून त्यांच्या कुटुंबियासमोर ठार केले. ढळक या अतिरेकी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. याचे प्रमुख आहेत शेख सज्जाद गुल आणि मोहम्मद अब्बास शेख आणि या हल्ल्याचा मास्टरमाइंड आहे सैफुल्ला कसुरी हे एवढ्यासाठीच सांगावे लागते की भारतातील तथाकथित बुद्धी गहाण ठेवलेले बुद्धिवादी अतिरेक्यांना धर्म नसतो असे सांगतात पण या सर्व बुद्धिवाद्यांना 'उघडा डोळे बघा नीट' हे सांगण्याची वेळ आली आहे.




पाकिस्तानी दहशतवाद्यांनी निरपराध हिंदू पर्यटकांवर हल्ला केल्यानंतर तातडीने मोदी सरकारने पाकिस्तानचा सिंधू जल करार रोखला, व्हिसा बंद केला,अटारी वाघा बॉर्डर बंद केली,पाक नागरिकांना ४८ तासात भारत सोडण्यास सांगितले या सर्व निर्णयाबद्दल भारत सरकारचे विश्व हिंदू परिषद आणि सर्व हिंदुत्ववादी संघटना तर्फे आम्ही अभिनंदन करतो तसेच लवकरात लवकर ज्या जिहादी अतिरेक्यांनी निष्पाप हिंदूंवर गोळ्या घातल्या त्या अतिरेक्यांना तातडीने पकडून उलटे टांगून मिरच्यांची धुरी देऊन काश्मीरमध्ये आणि पाकिस्तान मध्ये त्यांना मदत करणाऱ्यांची नावे घेऊन मदत करणाऱ्यांना अजन्म कारावासाची शिक्षा आणि ज्या अतिरेक्यांनी गोळ्या घेतल्या त्यांनाही त्याच पद्धतीने शिक्षा द्यावी द्यावी आणि दहशतवाद मुळासकट संपण्यासाठी पाकिस्तानमधील अतिरेक्यांचे सर्व अड्डे भारतीय सेनेमार्फत उद्ध्वस्त करावेत अशी मागणी सर्व संघटनातर्फे करण्यात आली.

यावेळी विश्व हिंदू परिषद संभाजीनगर महानगर मंत्री अभिषेक कादी यांनी दहशतवादी हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्या सर्वांना पकडून कडक शासन करावे अशी मागणी केली.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत संघचालक माननीय अनिल जी भालेराव श्री.हरीशजी कुलकर्णी डॉ. दिवाकर कुलकर्णी कुंदाताई अंदुरे , कन्हैयालालजी शहा , उपेंद्रजी अष्टपुत्रे , पृथ्वीराज पवार , अक्षय जोशी , गोपाल डोंगरे , सुमित चोरडिया , सुभाष बोडखे , हरिदास तुपे , कुंदाताई अंदुरे , मनोजजी पांगारकर , अमित जैस्वाल , सीमाताई कुलकर्णी , गीताताई आचार्य , श्रीवत्स आयाचित, केयुर जेहुरकर , प्रतीक खोंडे , हर्ष चावडा, मयूर चायाल, श्याम शेळके , अभिषेक माने , अतुलसिंग तवर , बाबूराव नालमवार , अभिषेक कादी इत्यादी विविध संघटनाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१००) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

अ.भा.वि.प. (ABVP) ही एक संघाची भारतीय विद्यार्थी संघटना आहे. याची स्थापना ९ जुलै १९४९ ला झाली. तेव्हा मुंबईचे प्रोफेसर श्री यशवंत केळकर याचे मुख्य कार्यवाहक होते. श्री. यशवंतराव व श्री. दत्ताजी डिडोळकर या दोघांनी साऱ्या भारतभर अभाविप उभी केली. त्यांचे म्हणणे सगळ्यात गंभीर समस्या माणूस आहे. आणि म्हणूनच व्यक्ती निर्माण करणे हे अभाविप चे काम आहे. त्यासाठी विचार - कार्यकर्ता- पैसा या दृष्टीने त्यांनी अभाविपला आत्मनिर्भर बनवले.

१ ज्ञान-शील- एकता, परिषदेची विशेषता २ गाव गाव मे जायेंगे, सामाजिक समता लायेंगे ३ अलग भाषा अलग वेष, फिर भी अपना एक देश ४ दिल्ली हो या गुवाहाटी, अपना देश अपनी मिट्टी असे स्फूर्तीप्रद उद् - घोष लाखो विद्यार्थ्यांच्या कंठातून एक मुखाने बाहेर पडतात. हा चमत्कार विद्यार्थी परिषदेच्या कार्यातूनच घडू शकतो. बाकी अन्य स्टुडन्ट फेडरेशन तुकडे तुकडे गैंग चे समर्थन करतात. या संदर्भात अधिक सांगणे न लगे.

संघटित छात्रशक्ती हीच राष्ट्र शक्ती असते त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे यावर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी अभाविपनी ६४७ ठिकाणी तिरंगा ध्वज फडकवला. आणि सर्वसामान्यांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवली. या आधी सुद्धा बांगलादेशी सर्व अवैध घुसकोरांविरूद्ध अभाविपने आंदोलन केले आहे. बांगलादेशाला तीन बिघा जमीन देण्याच्या विरुद्ध या संघटनेने आंदोलन केले होते. आवश्यक तेव्हा व तिथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात अभाविप पण नेहमीच तत्पर सेवा देते. निर्धन मेधावी छात्रांसाठी स्वामी विवेकानंद निशुल्क शिक्षा शिबिराचे आयोजन करते. नवी दिल्ली इथून राष्ट्रीय छात्र शक्ती हे अभाविपचे मासिक निघते त्याची १९७८ साली स्थापना झाली होती आग्रा मधील राष्ट्रीय अधिवेशनात जलीयांवाला बाग हत्याकांडाच्या शताब्दी वर्षापुर्ती निमित्ताने या हत्याकांडाची प्रदर्शनी भरवली होती. तिथे जालियनवाला बागेतील मातीचे कलश ठेवले होते नंतर हे कलश अभाविपनी साऱ्या भारतभर पोचवले व तिथल्या नृशंस हत्याकांडाची आठवण करून देऊन मनामनात राष्ट्रभक्ती जागवली. आज भारतभरातील महाविद्यालय विद्यापीठे येथे ABVP कार्यरत आहे. याची Team spirit-Team work-Planning in advance-Planning in details अशी वृंद (ढशरा) कार्यपद्धती आहे.

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## फोनपेतर्फे अक्षय्य तृतीयेनिमित्त हमखास कॅशबॅक ऑफर

मुंबई - फोनपे ने आज अक्षय्य तृतीयाच्या निमित्ताने २४ कॅरेट डिजिटल सोनेखरदीवर आकर्षक कॅशबॅक ऑफर्सची घोषणा केली. युझर्सनी फोनपे प्लॅटफॉर्मवर किमान २००० किमतीचे डिजिटल सोने खरेदी केल्यावर फ्लॅट १% (कमाल २००० पर्यंत) कॅशबॅक मिळू शकते. ही ऑफर फक्त ३० एप्रिल रोजी एकदाच होणाऱ्या व्यवहारासाठी लागू आहे (प्रत्येक युझरसाठी एकदाच वैध). युझर्स यूपीआय, यूपीआय लाइट, क्रेडिट आणि डेबिट कार्ड, वॉलेट आणि गिफ्ट कार्ड्ससारखे विविध पेमेंट मोड्स वापरून ही खरेदी करू शकतात. सणाच्या उत्साहात भर घालत कॅरटलेन स्टोअर्स व वेबसाइटवर डिजिटल सोन्याच्या रिडम्प्शनसाठी फोनपेतर्फे खास ऑफर देण्यात आल्या आहेत.

## पायलट ओरिएंटेशन डेचे आयोजन

पुणे - जगातील आघाडीच्या आंतरराष्ट्रीय विमानचालन अकादमींपैकी एक असलेल्या बीएए प्रशिक्षणादरम्यान, शनिवार, २६ एप्रिल रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत नोवोटेल पुणे नगर रोड, सिटी इन्फोपार्क, वेकफील्ड आयटी सिटी इन्फो पार्क, साकोरे नगर, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१४ येथे त्यांचा पायलट ओरिएंटेशन डे आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मोफत आहे आणि विमानचालनाच्या जगात एक आकर्षक ओळख करून देण्यासाठी इच्छुक वैमानिक आणि त्यांच्या कुटुंबियांचे स्वागत आहे.

## क्रेडाई महाराष्ट्र पदग्रहण समारंभ अजित पवार यांच्या हस्ते संपन्न

मुंबई : क्रेडाई - पुणे मेट्रो यांच्या आयोजनाखाली झालेला क्रेडाई महाराष्ट्राच्या पदग्रहण समारंभ अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री माननीय श्री. अजित पवार यांची उपस्थिती लाभली. तसेच या सोहळ्यात श्री. सतीश मगर, श्री. सुनील फुर्डे, श्री. राजेंद्रसिंह जबिंदा, श्री. शांतिलाल कटारिया आणि श्री. राजीव पारिख यांसारख्या बांधकाम क्षेत्रातील नामवंत नेत्यांनी सहभाग घेतला.

## जिओ वर्ल्ड ड्राइव्ह येथील टॉमी हिलफिगरच्या स्टोअरला भेट

नाशिक: टॉमी हिलफिगर, या पीव्हीएच कॉर्प.चा भाग असलेल्या ब्रँडने श्री. टॉमी हिलफिगर यांच्या भारतातील मुंबई भेटीची माहिती दिली. १५ एप्रिल २०२५ रोजी जगातील एका सर्वाधिक दमदार आणि स्टायलिश शहरात श्री. हिलफिगर यांनी फॅशन, सांस्कृतिक आदानप्रदान आणि संपर्क असा उत्साही दिवस व्यतित करत या ब्रँडची ओळख अधोरेखित केली. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स या मुंबईतील लक्झ्युरी शॉपिंग भागात असलेल्या जिओ वर्ल्ड ड्राइव्ह येथील टॉमी हिलफिगरच्या स्टोअरला भेट देऊन या दिवसाची सुरुवात झाली. भारतातील सर्जनशील व्यक्तींमध्ये गणल्या जाणाऱ्या सारा-जेन डायस आणि बॉलिवुड अभिनेत्री, मॉडेल आणि सामाजिक कार्यकर्त्या मानुषी छिल्लर यांच्यासोबत श्री. हिलफिगर यांचे चर्चासत्र झाले. या चर्चेत स्टाईल, फॅशन आणि जागतिक प्रभाव यातून अमेरिकन आणि भारतीय फॅशन संस्कृतीचा संगम यासंदर्भात विचार मांडण्यात आले.

## भारताचा पहिला व्यापक गुन्हेगारी कायदा डेटाबेस लॉन्च!

मुंबई : विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी ने नवी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे भारताचा पहिला व्यापक गुन्हेगारी कायदा डेटाबेस - द स्टेट ऑफ द सिस्टम (एस.ओ.एस.) लॉंच केला. सिस्टमची स्थिती उलगडणे या शीर्षकाच्या या कार्यक्रमात भारताच्या कायदेविषयक क्षेत्रात शिक्षेचे गुन्हेगारीकरण आणि तर्कसंगतीकरण करण्याच्या तातडीच्या गरजेवर चर्चा करण्यासाठी कायदेशीर दिग्गज, धोरणकर्ते आणि तज्ञांचे एक प्रख्यात पॅनेल एकत्र आले . हा अहवाल गेल्या १४८ वर्षांत लागू केलेल्या ३७० केंद्रीय कायद्यांअंतर्गत गुन्हेगार ठरवण्यात आलेल्या प्रत्येक कृती आणि चुकांचे दस्तऐवजीकरण करतो, ज्यामध्ये ४५ विषय क्षेत्रांचा समावेश आहे. हे भारतातील अशा प्रकारचे पहिले सार्वजनिक भांडार आहे आणि देशातील गुन्हेगारीकरणाच्या व्याप्ती आणि व्याप्तीची सखोल समज असलेले नागरिक, संशोधक आणि धोरणकर्ते सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवते. हे शिक्षेच्या नियमनातील विसंगती अधोरेखित करते आणि गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारी कायदा बनवण्याच्या दिशेने भविष्यातील प्रयत्नांना मार्गदर्शन करण्यासाठी एक तत्वनिष्ठ चौकट प्रस्तावित करते.

## गुलकंद येत्या १ मे रोजी प्रदर्शित होणार

छत्रपती संभाजीनगर - 'गुलकंद' चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाल्यापासून चित्रपटाबद्दलची उत्सुकता आता आणखीच वाढली आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आणि वेटक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला 'गुलकंद' हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर आता करण्यास सज्ज आहे. या चित्रपटात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, आणि शार्विल आगटे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'गुलकंद'ची निर्मिती सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया यांनी केली आहे.ट्रेलरमधून प्रेम कधीही, कुठेही, कुठल्याही वयात होऊ शकतं या प्रसादच्या संवादाने उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कथेत ढवळेंची मुलगी मीनाक्षी आणि मानेंचा मुलगा ओंकार यांच्या लग्नासाठी दोन कुटुंबं एकत्र येतात. परंतु या भेटीत अजून एक वेगळंच नातं निर्माण होतं. आता ढवळे आणि माने कुटुंबांमध्ये काय गोंधळ उडणार? आणि ही गुंतागुंत सुटेल का? याचं उत्तर १ मे रोजी प्रेक्षकांना चित्रपटगृहात मिळणार आहे.

'गुलकंद' हा एक हलकाफुलका कौटुंबिक विनोदी चित्रपट असून, नात्यांमधली गुंतागुंत, भावना, हास्य आणि गोडवा यांचा एक सुरेख मेळ आहे. ढवळे-माने कुटुंबांच्या संसारात मुरलेला 'गुलकंद' प्रेक्षकांसाठी एक परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव ठरेल, याची खात्री आहे.

## हिराबाई राघोजी शिरसाठ यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०६ ऑगस्ट - तालुक्यातील दाभाडी येथील कन्नड सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक, पत्रकार अनिल शिरसाट यांच्या मातोश्री हिराबाई राघोजी शिरसाट वय ९० वर्ष यांचे राहात्या घरी दि २३ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले दि.२४ एप्रिल गुरुवार रोजी सकाळी अकरा वाजता दाभाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यविधी झाला. पश्चात एक मुलगा,चार मुली, जावई, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे

# तालुक्यात राबवणार स्मशानभूमी समस्या निवारण अभियान



तभा वृत्तसेवा

कन्नड: दि.२४ एप्रिल - ग्रामीण भागातील अंत्यविधी साठी महत्त्वाची असलेली स्मशानभूमी ही अनेक ठिकाणी दुर्लक्षित राहिलेली आहे. कुठे जागेचा अभाव, तर कुठे रस्त्याचा प्रश्न, काही ठिकाणी ७/१२ वर नोंद नसलेली जागा; या व अशा अनेक अडचणींमुळे अनेक गावांमध्ये अंत्यसंस्कारासाठी कटू प्रसंगांना सामोरे जाण्याचा प्रसंग येतो. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे स्मशानभूमी समस्या निवारण अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आसुन प्रथम चार व शेवटचा एक अशा पाच टप्प्यात अभियान राबविण्यात येणार आहे. मे महिना अखेर जिल्ह्यातील सर्व स्मशानभुमीच्या समस्या सोडविण्यात आलेल्या असतील असे नियोजन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी कन्नड यांच्या अध्यक्षतेखाली कन्नड तालुक्या अंतर्गत सर्व ग्राम महसुल अधिकारी ग्राम पंचायत अधिकारी, यांची स्मशानभूमी समस्या निवारण अभियान कार्यशाळा दि.१७ रोजी तहसिल कार्यालय येथे घेण्यात येऊन दि . २२ एप्रिल पासून पहिल्या टप्प्याला सुरुवात करण्यात आली यात स्मशानभूमी संदर्भातील सर्वेक्षण व अभिलेख व्यवस्थापनाची माहिती दिली जाईल.

गावोगावी जाऊन स्मशानभूमीचा आढावा घेऊन वादग्रस्त जागा, रस्ते, नोंदी यांचा तपशील गोळा करुन तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधिक्षक भूमी अभिलेख संयुक्त बैठक घेऊन गावनिहाय समस्या वर्गीकरण, खर्चाचा अंदाज, ७/१२ सुधारणा, अभिलेख अद्ययावत करण्याची प्रक्रिया हाती घेतली जाईल. त्यानंतर सौंदर्यीकरण, रस्ते दुरुस्ती, शेड उभारणी, वृक्षारोपण आदी कामे प्रत्यक्ष सुरू होतील. लोकसहभागाने गावात वृक्षारोपण करुन मोहिमेचा दस्तऐवजीकरण अहवाल तयार केला जाईल. अशी माहिती उपविभाग अधिकारी संतोष गोरड यांनी दिली

यावेळी प्रभारी तहसीलदार दिलीप कुमार सोनवणे, मंडळ अधिकारी रमेश चव्हाण, ग्राममहसूल अधिकारी नितीन मगरे,दीपक एरंडे ,बाळू घटे यांची उपस्थिती होती.

# भगवान परशुराम जन्मोत्सवानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर -ब्राम्हण समाज समन्वय समीती व भगवान परशुराम जन्मोत्सव समीती-२०२५ व्दारा भगवान परशुराम जन्मोत्सवानिमीत्त आयोजित पत्रकार परिषदेत समन्वय समीतीचे अध्यक्ष मिलींद दामोदरे, कार्याध्यक्ष सुरेश देशपांडे, सचीव मंगेश पळसकर व जन्मोत्सवाचे प्रकल्प प्रमुख सीएस लक्ष्मीकांत जयपूरकर यांनी जन्मोत्सवानिमीत्त आयोजित विविध कार्यक्रमांची माहिती दिली.

दि. २४ एप्रील रोजी सायं ६ वाजता जन्मोत्सवाचे कार्यालय सावरकर चौक, समर्थनगर येथे समाजाचे प्रेरणास्थान व भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष श्री शिरीषजी बोराळकर यांच्या हस्ते होणार आहे.

दि. २५ रोजी सकाळी ९ ते सायं ५ दरम्यान कण्व भवन, शिवाजीनगर येथे दत्ताजी भाले रक्तपेढीच्या सौजन्याने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता समर्पण ग्रुप आयोजीत राणी लक्ष्मीबाई टर्फ किकेट लिग या युवतीसाठी तीन दिवशीय किकेट स्पर्धेचे आयोजन समृध्दी पार्क, शास्त्री नगर येथे करण्यात आलेले असून स्पर्धे चे उदघाटन सायं. ५ वाजता करण्यात येणार आहे. स्पर्धेची सांगता दि. २७ रोजी होईल. यात १२ टिम सहभागी होणार असून दररोज सकाळी ७ ते ११ व सायं ४ ते १० दरम्यान सामने होणार आहेत. तसेच सायं. ५ वाजता श्री समर्थ राम मंदिर, वरद गणेश मंदिराच्या शेजारी, समर्थनगर येथे भगवान परशुरामावर व्याख्यान ठेवले असून त्यात प्रख्यात नारदीय किर्तनकार व शारदा मंदिरच्या मुख्याध्यापिका डॉ. सौ. सविता जयंत मुळे या मार्गदर्शन करतील.

दि. २७ एप्रील रोजी श्री नाथ मंदिर, औरंगपूरा व वाळूज येथे सकाळी ९ ते ५ दरम्यान भव्य रक्तदान शिबीर व आरोग्य शिबीराचे सिग्मा हॉस्पीटलच्या सौजन्याने आयोजन करण्यात आले असून कण्व भवन येथे सकाळी १० त ३ दरम्यान आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच काला चष्मा, आंबेडकर भवनासमोर येथे मोफत नेत्र चिकीत्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

चित्तपावन ब्राम्हण मंडळाव्दारे दि. २७ एप्रील रोजी सायं ६ वाजता श्रीनीधी हॉल, एकनाथ रंगमंदिरामागे, उस्मानपुरा येथे 'जीवन इच्छापत्र का व कशासाठी' या अतिशय महत्वाच्या विषयावर नासिकचे ॲड महेंद्र एकबोटे यांचे व्याख्यान ठेवले आहे.

दि. २९ रोजी श्री राजस्थानी विप्र मंडळ व विप्र फाउडेंशन यांच्याव्दारा श्री समर्थ राम मंदिर, वरद गणेश मंदीराशेजारी, समर्थनगर येथे श्री भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पुजन व त्यानंतर सकाळी ८ ते ३ दरम्यान रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २९ रोजी सकाळी ८ वाजता कांती चौक ते परशुराम स्तंभ, औरंगपूरा दरम्यान दुचाकी वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले असून यात मोठ्या प्रमाणावर तरुण-तरुणीं व समाजबांधवाचा सहभाग असणार आहे. या रॅलीत किमान ५०० वाहने असतील.

दि. २९ रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान परशुराम स्तंभाचे पुजन प.पु. माई महाराज, चार वेद व संत-महंताच्या हस्ते करण्यात येणार असून त्यानंतर तेथे मान्यवर मार्गदर्शन करतील. तेथे विविध लोकप्रतिनीधी व प्रतिष्ठीत व्यक्तींचा सत्कारसुध्दा आयोजीत करण्यात आला आहे. दि. २९ रोजी सायं ४.३० वाजता श्री संस्थान गणपती, राजाबाजार येथे पुजन व आरती करुन भव्य शोभायात्रेस आरंभ होईल. ही शोभायात्रा गांधी पुतळा, शहागंज, सराफा, सिटी चौक, मछली खडक, गुलमंडी यामार्गे जाउन परशुराम स्तंभ, संभाजीपेठ, औरंगपूरा पोलीस चौकीजवळ समारोप होईल. या शोभायात्रेत, भगवान परशुराम, विविध संत-महंत यांचे तीन रथ, घोडे, भालदार-चोपदार, तीन ढोलपथके, लेझीम पथक, विविध संस्थांचे ५ रथ, वादय पथक आदी असणार आहे. या रॅलीत साधारणतः १०,००० समाज बांधव सहभागी होतील यासाठी जन्मोत्सव समीती प्रयत्नशील आहे. या जन्मोत्सवात काण्व ब्राम्हण समान, विश्वब्राम्हण सेवाभावी संस्था, विप्र फाउडेंशन, राजस्थानी विप्र मंडळ, बी.बी.एन. फाउडेंशन, वेद मित्र मंडळ, श्री राजस्थानी विप्र युवा मंच, उत्तरदेशीय ब्राम्हण सेवा समीती, समर्पण ग्रुप, ब्राम्हण युवत संघटना, देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण सभा, ब्राम्हण बिझनेस नेटवर्क ग्लोबल, क-हाडे ब्राम्हण संघटना आदी ५० संघटनांचा सहभाग आहे.

## दि मलकापुर अर्बन को-ऑप बँक लि., मलकापुर (अवसायनात)

धनश्री, बुलढाणा रोड, मलकापुर -४४३१०१ जि. बुलढाणा

### जाहीर सुचना

या बँकेच्या सर्व ठेवीदाराना सुचित करण्यात येते की, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी बँकेचे अवसायक व बँकेचे अधिकारी वर्ग हयांच्यात झालेल्या चर्चेनुसार व सभेतील ठरावानुसार बँकेकडे वसुलीमधुन जमा झालेल्या निधीमधुन ठेवीदारांना त्यांच्या बँकेकडे चालू, बचत तसेच मुदती ठेवीमध्ये दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी जमा असणाऱ्या एकूण ठेव रकमेच्या ५०% एवढी रक्कम ठेवीदारांना परत करण्यांबाबत निर्णय झालेला आहे.

सबब या जाहीर सुचनेव्दारे सर्व ठेवीदारांना कळविण्यांत येते की, दि मलकापुर अर्बन को-ऑप बैंक लि., मलकापुर (अवसायनांत) या बँकेकडे ज्यांच्या ठेवी जमा आहेत अशा ठेवीदारांनी ठेवींसंबंधी कागदपत्रे (संस्था असल्यास सदर संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधींच्या सही शिक्यांसह व ठरावासह), अदययावत के. वाय.सी. व ज्या बँकेमध्ये रक्कम जमा हवी असेल त्या बँकेच्या खात्याचा रद्रद केलेला चेक किंवा पासबुकच्या पहील्या पानाची फोटोप्रत इत्यादी बँकेच्या ज्या शाखेमध्ये आपली ठेव जमा आहे त्या शाखेमध्ये जमा करावे. त्यानुसार प्राधान्य क्रमाने ठेवीदारांना निधीचे वितरण करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कृपया परस्पर मुख्यालयाकडे कोणतेही प्रस्ताव सादर करु नये.

डॉ. अशोक वामनराव खरात
अवसायक
दि मलकापुर अर्बन को-ऑप बँक लि., मलकापुर (अवसायनांत)

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

सार्वजनिक बांधकाम विभाग

उड्डाणपूल भूसंपादन निधी व महा. सु.ज.यो. (जिल्हास्तर) योजना
सन २०२५-२६ अंतर्गत
फेर ई-निविदा सूचना क्र.२६९/सन २०२५-२६
ई-निविदा आय.डी.क्र.1172929-1

उड्डाणपुल भूसंपादन निधी व महा.सु.ज.यो.(जिल्हास्तर) अंतर्गत एकूण ०१ कामांकरिता फेर ई निवीदा नोटीस क्र. २६९ ऑनलाईन पध्दतीने निवीदा मागविणेसाठी मा. महाराष्ट्र शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३३९/२०२५ पुढील तारीख २१/०६/२०२५

अर्जदार : १. जानकाबाई भ्र.शामराव गोरडे, रा.बाळानगर, ता.पैठण जि. औरंगाबाद २. सरस्वती भ्र.भागचंद पेरे, रा. पाटोदा, ता.जि.औरंगाबाद ३. व्दारकाबाई है. तातेराध चापे, रा. कदीम शहापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ४. अर्जुन रामभाऊ गावंडे, रा.घर नं. १००, गल्ली नं. ८. गजानन नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद ५. गीताबाई भ्र.एकनाथ चापे, रा.कदीम शहापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ६. कौसाबाई विनायक केरे, रा.पाटोदा, ता.जि.औरंगाबाद ७. नारायण रामभाऊ गावंडे, रा. मांगेगाव, ता गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.जी. मोकरे, गगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन रामभाऊ गणपती गावंडे आणि रुख्मनबाई रामभाऊ गावंडे हे पती-पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. १ ते ७ यांचा जन्म झालेला आहे. रामभाऊ गणपती गावंडे यांचा दि. ३१/०३/२००४ रोजी मौजे मांगेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे आणि रुख्मनबाई रामभाऊ गावंडे यांचा दि. १२/०८/२०२२ रोजी मौजे मांगेगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयताना अर्जदार नं. १ ते ७ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

जय फेरीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि. दि. अर्ज क्र. ३४४/२०२५ पु.ता. २५/६/२०२५

अर्जदार - १)योगेश प्रकाश माघाडे वय ३५ वर्षे धंदा मजूरी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) मंगेश प्रकाश माघाडे वय ३७ वर्षे, धंदा मजुरी रा मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. निता रविंद्र पारखे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः- १ ) रमेश दामोधर माघाडे, वय सज्ञान धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) देविदास दामोधर माघाडे वय सज्ञान धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) बेबीबाई भ्र. योसेफ भोसले वय ५८ वर्षे धंदा घरकाम रा. भामाठाण ता. नेवासा जि. अहिल्यानगर ४) मोनिका भ्र हरकचंद गडकर वय ५४ वर्षे धंदा घरकाम रा. शिरेसायगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) शोभा भ्र. शाम साळवे, वय ५० वर्ष धंदा घरकाम रा. फ्लॅट नं.३०२, ३ रा मजला, वेकरी नगर, मल्हार हाईट, हडपसर पुणे ६) शोभा भ्र. भानुदास माघाडे वय ६५ वर्षे धंदा घरकाम रा मांजरी ता गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) अनिल भानुदास माघाडे, वय ४४ वर्षे धंदा मजुरी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) अरुण भानुदास माघाडे, वय ४० वर्षे धंदा मजुरी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) संतीष भानुदास माघाडे, वय ३५ वर्षे धंदा मजुरी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर १०) शितल अरविंद नितनवरे वय ३२ वर्षे धंदा घरकाम रा. नरसापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ११) रत्नमाल भ्र राजकुमार माघाडे वय५०वर्षे धंदाघरकाम रा मांजरी तागंगापुर जि छत्रपती संभाजीनगर १२) अभय राजकुमार माघाडे वय २२ वर्षे धंदा मजुरी रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर १३) प्रिती भ्र. विशाल वंजारे, वय सज्ञान धंदा घरकाम रा. भानसहिवरा ता. नेवासा जि. अहिल्यानगर १४) आरती पि राजकुमार माघाडे वय सज्ञान धंदा मजुरी रा मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.वी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, दामोधर राधाजी माघाडे हे मौजे मांजरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/११/१९८३ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर येथे मयत झाले आहे, मयत दामोधर राधाजी माघाडे यांची पत्नी शांताबाई दामोधर माघाडे या यापुर्वीच मयत झालेल्या आहे, मयत दामोधर व मयत शांतावाई यांना एकुण पाच मुले म्हणजेच गैरअर्जदार क्र.१ रमेश दामोधर, गैरअर्जदार क्र.२ देविदास दामोधर, भानुदास दामोधर, प्रकाश दामोधर व राजकुमार दामोधर आणि तीन मुली गैरअर्जदार क्र.३ बेबीवाई योसेफ, ४) मोनिका हरकचंद व ५) शांभा शाम असे अपत्ये होते, यापैकी मुलगा भानुदास दामोधर माघाडे हा मुलगा मयत झाला असुन त्यास गैरअर्जदार क्र.६ ही पत्नी, गैरअर्जदार क्र.७ ते ९ हे मुले व गैरअर्जदार क्र. १० ही मुलगी असे वारस आहेत, तसेच दुसरा मुलगा प्रकाश दामोधर माघाडे हे दिनांक २४/०४/२०१९ रोजी मयत झाले असुन मयत प्रकाश दामोधर यांची पत्नी नामे प्रमिला प्रकाश माघाडे या दिनांक २५/०६/१९९६ रोजी मयत झाल्या असुन मयत प्रकाश व मयत प्रमिला यांना अर्जदार क्र.१ व २ हे मुले व अर्जदार क्र.३ ही मुलगी असे कायदेशीर वारसदार आहेत व तसेच तिसरा मुलगा राजकुमार दामोधर माघाड हे मयत झाले असुन त्यांना गैरअर्जदार क्र.११ ही पत्नी, गैरअर्जदार क्र.१२ हा मुलगा व गैरअर्जदार क्र.१३ व १४ या मुली असे कायदेशीर वारसदार आहे. येणे प्रमाणे मयत दामोधार राधाजी माघाडे यांना अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार क्र.१ ते १४ असे कायदेशीर वारसदार असुन यांच्या व्यतिरीक्त मयत दामोधर राधाजी माघाडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्धीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख...

# जिहाद्यांना कायमचे ठेचा!

जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे लष्करी गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी २२ एप्रिलच्या दुपारी नाव आणि धर्म विचारून, २३ हिंदू पर्यटकांच्या केलेल्या नृशंस हत्यांचा अतिशय कठोर शब्दात निषेध केला जायला हवा. अतिरेक्यांनी २ मुस्लिमांसह २ विदेशी प्रर्यटकांची केलेली हत्याही निषेधार्हच म्हणावी लागेल. या भ्याड कृत्याची केवळ निंदा करून भागणार नाही तर अतिरेक्यांचा सफाया आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांना अथवा त्यांचे समर्थन करणाऱ्या लोकांना कठोर शिक्षा हाच यावरील उपाय राहू शकतो. त्यादृष्टीने सरकारने पावले उचलली असून, पळून गेलेल्या व जंगलात दडून बसलेल्या दहशतवाद्यांच्या अटकेसाठी सेनेच्या जवानांची मदत घेतली जात आहे. या हल्ल्याचा २६/११च्या हल्ल्याशी असलेला सारखेपणाही उघड झाला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील लाहोर शहरातून सूत्रे हाकणाऱ्या लष्कर-ए-तय्यबाशी जुळलेल्या द रजिस्टन्ट फ्रन्टने (टीआरएफ) घेतली आहे. ही पाक समर्थित कट्टरपंथी सुन्नी मुस्लिमांची संघटना आहे. या संघटनेच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांची नावे आणि धर्म विचारला आणि त्यांना कलमा म्हणायला लावल्या. ज्यांना कलमा म्हणता आल्या नाहीत, त्यांची त्यांनी गोळ्या घालून हत्या केली. सर्व दहशतवाद्यांनी स्थानिक पोलिसांचा गणवेश परिधान केला होता आणि मुखाच्छादन घातले होते. दहशतवाद्यांनी बहुतांशी हिंदू पुरुषांनाच लक्ष्य केले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा मध्येच स्थगित करून मायदेशी परतले आहेत. भारतात दाखल होताच त्यांनी विमानतळावरच परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, विदेश सचिव विक्रम मिस्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. पंतप्रधानांनी त्यांच्या एक्स हँडलवर या हल्ल्यात प्रियजनांना गमावलेल्यांबद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या. हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांना तत्परतेने मदत करण्याचे आश्वासन दिले. दहशतवाद्यांशी लढण्याचा आमचा संकल्प जारी राहील, असे सांगून या कृत्यामध्ये सहभागी असलेल्यांना न्यायालयाच्या कटघऱ्यापर्यंत आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तत्काळ पहलगाम येथील बैसरनचा दौरा केला आणि मृत नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. पीडित परिवारांची भेट घेऊन त्यांनी दहशतवाद्यांना सोडले जाणार नाही, अशी ग्वाही दिली. या दहशतवादी हल्ल्याची नोंद जगानेही घेतली असून, अनेक देशांच्या राष्ट्राध्यक्षांचे या घटनेची निंदा करणारे संदेश भारताला प्राप्त होत आहेत. दहशतवादाच्या मुद्यावर इस्रायल आणि इटली भारताच्या बाजूने उभे असल्याचे चित्र दिसत आहे. या हल्ल्याचा त्यांनी निषेध केला आहे आणि भारतासोबत एकोप्याने राहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. दहशतवादाकडे बघण्याची अब्दुल्ला कुटुंबाची भूमिका आता तपासली जायला हवी. राजकारणात दहशतवाद्यांबाबतच्या त्यांच्या लवचीक भूमिकेमुळे बंदूकधाऱ्यांना बळ मिळाले, ही बाब कशी नाकारता येईल?

पहलगामच्या भ्याड हल्ल्यासाठी पाच पाकिस्तानी वंशाचे दहशतवादी जबाबदार असल्याचे कळत आहे. या सर्वांची स्केचेस पोलिसांनी जारी केली आहेत. त्यांना स्थानिक दहशतवाद्यांची मदत मिळाल्याचे पुरावेही हाती आले आहेत. काही दिवस पुरेल असे साहित्य सोबत बाळगून, दहशतवादी हल्ल्यानंतर जंगलाच्या दिशेने पळून गेले होते. घटनेचे ३७० कलम निष्प्रभ ठरविल्यापासून जम्मू-काश्मिरात शांतता नांदत होती. त्यामुळे राज्यातील व्यवसायाला चालना मिळू लागली होती. बंद असलेल्या शाळा पूर्ववत् सुरू झाल्या होत्या. महाविद्यालयेही नियमित सुरू झाली होती. राज्यातील तरुणाई क्रीडांगणावर आपल्यातील कौशल्य दाखवू लागली होती. दगडफेकीच्या घटना इतिहासजमा झाल्या होत्या आणि पर्टयनादी उद्योगांना तेजी आली होती. हॉटेल्स आणि टॅक्सी व्यवसायालाही चांगले दिवस आले होते. पण खोऱ्याचे हे शांत राहणे, अस्थिरता संपणे, जनजीवन पूर्वपदावर येणे पाकिस्तानला आणि त्यांच्या साह्याने दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्यांना मान्य नव्हते. म्हणूनच २२ एप्रिलला दुपारी हातात अत्याधुनिक बंदुका घेतलेल्या ५ दहशतवाद्यांनी मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात खुनाची होळी खेळली. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने लष्कराला खुली सुट दिल्याने त्यांनी आतंकवाद्यांचा कणा मोडून टाकला आहे. त्यामुळे ते चिडून गेले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, या हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांचा समावेश आहे. विशेष नमूद करण्यासारखी बाब म्हणजे १६ एप्रिलला पाकिस्तानचे लष्कर प्रमुख आसिम मुनीर यांनी काश्मीरबाबत आम्ही कदापि काश्मीर विसरू शकत नाही, असे विखारी वक्तव्य केले होते. काश्मीर आमच्यासाठी गळ्याची रक्तवाहिनी असल्याचे त्यांनी नमूद केले होते. पाकिस्तानसाठी अजूनही काश्मीर हा कळीचा मुद्दा आहे. काश्मीर पुन्हा बळकावण्याचे त्यांचे प्रयत्न सुरूच आहेत. अमेरिकी उपराष्ट्रपती जेडी वान्स हे त्यांची हिंदू पत्नी आणि मुलांसह भारत दौऱ्यावर असताना तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असताना हा हल्ला झालेला आहे. त्यामुळे दहशतवाद्यांनी हल्ल्यासाठी निवडलेला मुहूर्त ध्यानात घेतला जायला हवा. वर्ष २००० मध्येही पाकिस्तानने भारताविरुद्ध असे कटकारस्थान आखले होते. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन भारत दौऱ्यावर होते. तेव्हा दहशतवाद्यांनी सहपुरा येथे ३६ निर्दोष शिखांची हत्या केली होती. पहलगामच्या हल्ल्यातून इस्लामी आणि जिहादी मानसिकतेचेच दर्शन होत आहे. दहशतवादाचा धर्म नसतो हे मान्य पण प्रत्येक दहशतवादी मुस्लिमच निघतो, याकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? स्वतःला शांतिप्रिय म्हणवून घेणारा समाज दहशतवादाचे समर्थन कसा करू शकतो, हा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. जम्मू-काश्मिरातील हिंदू पर्यटकांची नृशंस हत्या करणाऱ्या इस्लामी मानसिकतेचा आणि तिला पाठिंबा देणाऱ्या प्रवृत्तीचा विश्व हिंदू परिषदेने निषेध केला असून, एका हिंदूच्या हत्येच्या बदल्यात १०० इस्लामी आतंकवाद्यांना मारले जायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यानिमित्ताने २५ एप्रिलला सर्व मंदिरांमध्ये निषेध सभांचे आयोजन केले जाणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. मुस्लिम राष्ट्रीय मंचाने आता पाकिस्तानमुक्त जगाची वेळ आली आहे, या शब्दात घटनेची निंदा केली आहे. हे केवळ भारतावरील नव्हे तर संपूर्ण सुसंस्कृत जगावरील आणि मानवतेविरुद्धचे नियोजित युद्ध आहे, अशी प्रतिक्रिया संघटनेतर्फे दिली गेली आहे. मंचाने म्हटले आहे की, आता जागतिक समुदायाने पाकिस्तानमध्ये वाढणाऱ्या दहशतवादी तळांना नष्ट करण्यासाठी निर्णायक आणि एकत्रित पावले उचलण्याची वेळ आली आहे. बचावात्मक राजनैतिकता आता चालणार नाही, भारताला निर्णय घेण्याची राजनैतिकता स्वीकारावी लागेल. या हल्ल्याच्या निमित्ताने संपूर्ण हिंदू समाजाला पुन्हा एकदा 'एक है तो सेफ है'चा धडा मिळाला आहे. दहशतवाद्यांनी अतिशय शांत डोक्याने हे कुकृत्य घडवून आणले आहे. त्यांनी हत्या करताना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र तसेच उत्तर वा दक्षिण भारतीय अथवा तामिळ, पंजाबी, मल्याळी, कोकणी भाषी असा कुठलाच फरक केला नाही. त्यांनी हे भाजपाचे मतदार आहेत, काँग्रेसचे समर्थक आहेत की समाजवादी पार्टीचे साथीदार आहेत, हेही बघितले नाही. हत्या झालेल्यांची केवळ एकच चूक होती की त्यांनी हिंदू धर्मात जन्म घेतला होता, ते गैरमुस्लिम होते. एका तरुण नवविवाहितेच्या पतीच्या डोक्यात, तो केवळ हिंदू आहे म्हणून गोळ्या घातल्या गेल्या. दहशतवाद्यांच्या हल्ल्याला भारत पहिल्यांदाच सामोरा जात आहे, अशी परिस्थिती नाही. भारताने जगाला पाकिस्तानच्या मातीतून जन्म घेणाऱ्या दहशतवादाबाबत आधीच सजग केलेले आहे. यातूनच पाकिस्तान एकटा पडला असून, त्याची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे. आपल्याप्रमाणेच भारतही खिळखिळा व्हावा, ही त्यांची इच्छा असली तरी ती कधीही पुरी होणारी नाही. दहशतवादी हल्ल्याच्या धक्क्यातून बाहेर पडून भारत पुन्हा एकदा त्याविरुद्धचा लढा अधिक प्रखर करणार आहे. जिहाद्यांना कायमचे ठेचले जावे, हीच तमाम हिंदूंची मागणी आहे आणि ती नक्की पूर्ण होईल, याची खात्री देणाऱ्या हालचाली सुरू आहेत.


## तंत्रवेध

# शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा

**डॉ. दीपक शिकारपूर**

आजघडीला आपला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे, परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते 'वसुधैव कुटुंबकम' ही आपली संस्कृती असून, देशाच्या कामगिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची हाक दिल्यापासून विविध प्रसार माध्यमांमधून त्याबाबत चर्चा सुरू आहे. स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी, अशी अपेक्षा आहे. सध्याच्या वैश्विकीकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल, अशी बारा क्षेत्रे अधोरेखित केली गेली आहेत. अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती, लोह, अल्युमिनियम आणि तांबे, कृषी-रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक यंत्रसामग्री, फर्निचर, चर्मोद्योग, ऑटोमोबाईल पार्ट्स, वस्त्रोद्योग आणि मुखावरणे, सॅनिटायझेशन आणि वेंटिलेटर्स ही ती क्षेत्रे आहेत.

संगणकापासून संरक्षण उत्पादनांपर्यंत आपण आत्मनिर्भर झालो, 'मेक इन इंडिया'चा आग्रही पुरस्कार करत स्वतःच्या पायावर उभे राहिलो, तर भविष्यात उद्‌भवू शकणाऱ्या सर्व पेचप्रसंगांना यशस्वीपणे तोंड देऊ शकू. ऊर्जा, पाणी, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषध निर्माण अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करावे लागेल. स्थानिक मनुष्यबळाची मानसिकता बदलावी लागेल आणि त्यांनी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. या दिशेने प्रयत्न करणे हा आत्मनिर्भर होण्यासाठीच्या धडपडीचाच भाग ठरेल. आपण एक आर्थिक महासत्ता होण्याचा प्रयत्न करू आणि या मोहिमेत आपले लढवय्ये असतील हे कुशल मोहरे. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. देशाची वाढती लोकसंख्या ही पहिलेपासून एक फार मोठी समस्या मानली गेली असून त्यानुसार, लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी २५-३० वर्षांपूर्वी कुटुंब नियोजन, नसबंदी शस्त्रक्रिया वगैरे उपायही केले गेले. त्या काळातली विचारप्रणाली वेगळी होती. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता बनण्यासाठी करता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही.



आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या मनुष्यबळाचा योग्य रीतीने वापर करण्याची वेळ आली आहे. तरूणवर्गाची इतकी मोठी संख्या असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले असून झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे. ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या तरुण वर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरुण-तरुणी जागतिक पातळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा, बचतीच्या रूपाने, भारतात परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न म्हणजेच जीडीपी तसेच उत्पादकताही वाढेल आणि इथल्या तरुण वर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज भारतात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये आणि घडामोडींमध्ये या मानवी भांडवलाचा फार मोठा हिस्सा तर आहेच, परंतु महत्त्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांमधील एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य... संपूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या या क्षेत्रांकडे नजर टाका, म्हणजे आपल्याला नक्कीच फरक जाणवेल.

आज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही नवे धडाडीचे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून आत्मविश्वास आणि दूरदृष्टीने गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. आपल्याला सर्वप्रथम शिक्षणाबाबतची, विशेषतः उच्च शिक्षणाबद्दलची पारंपरिक विचारपद्धती टाकून देऊन शिक्षणाला मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचीक आणि बदलत्या गरजा वेगाने सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील तर आपल्या मुला-मुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरील रोजगारांची चाहूल लागली की आपल्याकडील युवकवर्ग इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी यासारख्या भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुक बनतील. शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आतापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला येत्या काळामध्ये ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाच्या किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. शालेय शिक्षणाची आज आपण बारा वर्षे मानतो, परंतु तेवढेच शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. आता संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येत असून या मार्गाने देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना, वाजवी किमतीत, उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल, शांतता नांदेल आणि एकी वाढेल. देशातील सर्वच लोकांच्या हाती पुरेसा पैसा खेळू लागला की ते बाहेरील फुटीरतावादी शक्तींना बळी पडणार नाहीत. देशात येऊ घातलेल्या या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुला-मुलींना शिक्षण देण्याबाबतच्या स्वतःच्या दृष्टिकोनात योग्य ते बदल करायला हवेत. त्यांना पुस्तकातले किडे न बनवता हरहुन्नरी होऊन जगात वावरण्यासाठी लागणारी सर्व कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

# खाजगी बाबी शेअर करताना!

**नंदकिशोर काथवटे**

सुलभ, सोप्या प्रक्रिया आणि अत्यल्प दरात मिळणाऱ्या इंटरनेट सुविधांमुळे जग अगदी एका क्लिकवर आले आहे. स्मार्ट फोनमुळे माहिती शेअर होण्याच्या प्रकारात कमालीची वाढ होताना दिसून येत आहे. खाजगी आयुष्य आता समाज माध्यमांमुळे खाजगी राहिलेले नसून ते प्रत्येक सेकंदाला सार्वजनिक होऊ लागले आहे. हेच सोशल ट्रेंड्स आता धोक्याचे ठरू लागले आहे. मोबाईल वापरताना फेसबुक, इन्स्टाग्राम आणि ट्युटरसह इतरही ॲपचा वाढलेला वापर आता चिंताजनक ठरत आहे. त्यातच एआयसरख्या प्रकारामुळे एखाद्या गोष्टीची, फोटोची वास्तविकताच बदलली जात आहे. खरे काय, खोटे काय हे देखील एआयच्या वापरामुळे कळायला मार्ग नाही. निश्चितच काही ॲप कामाचे आहेतही मात्र काही ॲप असे आहेत की, जी तुमचा डेटा इतरत्र वापरू लागले आहेत. आणि याची साधी भनक सुद्धा आपल्याला नाही. आपण समाज माध्यमावर शेअर केलेला डेटा आता प्रायव्हसी नियमाचा भंग करून तो इतरत्र सर्रास आपल्या फायद्यांसाठी सायबर क्रिमिनल वापरू लागले आहेत. रोज स्मार्ट मोबाईलमध्ये नवनवीन ॲप एंटर होतात आपणही त्या ॲपची कुठलीही चौकशी न करता त्या ॲपला आपला डेटा वापरण्याची न कळत परवानगी देतो. आणि हीच खरी डोकेदुखी आहे. आपल्या अजाणतेमुळे एखाद्या वेळेस आपले आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. याची कल्पना सुद्धा समाज माध्यमांचा अति वापर करणाऱ्यांना माहिती नाही. समाज माध्यमांवर कुठली माहिती शेअर करायची आणि कुठली करू नये याचे भानसुद्धा समाज माध्यम वापरणाऱ्यांना नसल्याने अनेक अनुचित प्रकार घडू लागले आहेत. आपण समाज माध्यमावर शेअर करणारी माहिती सुरक्षित आहे का, तिचा कुठे वापर केला जात आहे का हे तपासण्याचा बहुतांश लोक प्रयत्नसुद्धा करीत नाही. काही दिवसांपूर्वी जगभरात आलेली घिबली इमेजची लाट भारतातही येऊन गेली. गंमत म्हणून लोकांनी आपले घिबली प्रकारातील ॲनिमेटेड चित्र समाज माध्यमावर सर्व मान्य केले. यापूर्वी सुद्धा असे अनेक प्रयोग येऊन गेले आहेत. परंतु आपण दिलेल्या या माहितीचा एआयच्या प्रशिक्षणासाठी उपयोग केला जातो हे वास्तव आता पुढे आले आहे. विशेष म्हणजे आपली माहिती यासाठी वापरली जाते हे बहुतांश भारतीयांना माहीतच नसल्याचेही सत्य उघडकीस आले आहे. मुबलक मिळणाऱ्या इंटरनेट डेटामुळे रील्स, फेसबुक, इन्स्टाग्राम हाताळणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढू लागली आहे. तासन्तास लोक रील बनविण्यासाठी वेळ वाया घालवू लागले आहे. समाजामध्ये दोन वर्ग तयार झाले आहेत. एक रील बनवून समाज माध्यमावर त्या रील्स व्हायरल करणारा वर्ग आणि दुसरा म्हणजे महत्त्वाची कामे सोडून तासन्तास त्या रील्स बघत बसलेला वर्ग. या रीलसच्या नावाखाली अनेक वल्गर प्रकारही समाज माध्यमांवर व्हायरल होऊ लागले आहेत. काहीच दिवसांपूर्वी आलेला घिबली एआय ट्रेंड हा देखील यातलाच प्रकार आहे. याचा उपयोग करून लाखो भारतीयांनी आपले घिबली स्टाईल फोटो तयार केले. मात्र या प्रकारातून स्वतःची माहिती एआयला देऊन या माहितीच्या जाळ्यात अडकत असल्याचे लोकांच्या लक्षात येत नाही. एआय टूल्सला प्रशिक्षण देण्यासाठी प्रचंड डाटाची गरज असते. एआयच्या चॅट जीपीटीला ३०० अब्ज शब्दांपेक्षा जास्त डेटावर प्रशिक्षित करण्यात आले आहे. यात संकेतस्थळे, समाजमाध्यमे, पुस्तके यातून गोळा केलेली माहिती आहे. भारतातील जनरल डाटा प्रोटेक्शन रेग्युलेशन कायदे कठोर होण्याची गरज तज्ज्ञांनी वेळावेळी व्यक्त केली आहे. मात्र याकडे कुणाचेच लक्ष नाही. इंटरनेट इन इंडिया २०२४ च्या अहवालानुसार भारतात इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. परंतु बहुतेक वापरकर्त्यांना त्यांचा डेटा ऑनलाईन कसा वापरला जात आहे याची माहितीच नाही. ५९ टक्के वापरकर्त्यांना त्यांच्या डेटाचे काय होते याबद्दल काहीही माहिती नाही. तर ग्राहक अहवाल २०२३ नुसार ७० टक्के भारतीयांना त्याची माहिती कुठे आणि कशाप्रकारे वापरली जाते याबद्दल काहीच माहिती नाही. याच प्रकारामुळे आता डेटा प्रायव्हसी सॉफ्टवेअरची बाजारात प्रचंड वाढ होत आहे. या सॉफ्टवेअरचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येकाला आपला खाजगी डेटा सुरक्षित राहावा यासाठी डेटा प्रायव्हसी सॉफ्टवेअरची गरज भासू लागली आहे. त्यामुळे या सॉफ्टवेअरचा २०२३ मध्ये बाजार २.७६ अब्ज डॉलर्स होता. २०२४ मध्ये तो वाढून ३.८४ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका झाला. २०३२ पर्यंत ही बाजारपेठ ४५.१३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे आपला डेटा किती महत्त्वाचा आहे, तो कसा व्हायरल होतो, सोशल मीडियावर काय अपलोड करावे, काय करू नये, इंटरनेटच्या आहारी जावे की, जाऊ नये हे आता उपयोगकर्त्यांनीच ठरविले पाहिजे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# गांधी कुटुंबाविरुद्ध दाखल गुन्हे

**श्यामकांत जहागीरदार**

नॅशनल हेराल्ड प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह आणखी काही नेत्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. या पाठोपाठ गांधी घराण्याचे जावई आणि काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा यांना हरयाणातील शिकोहपूर येथील भूखंड घोटाळ्याप्रकरणी ईडीने चौकशीसाठी बोलावले. यामुळे सध्या गांधी घराण्याचे ग्रह फिरल्याचे म्हणायला हरकत नाही.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात ९८८ कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप गांधी कुटुंबावर आहे. या प्रकरणी दाखल झालेल्या आरोपपत्रात सोनिया गांधी या आरोपी क्रमांक एक तर राहुल गांधी आरोपी क्रमाक दोन आहे. सॅम पित्रोदा, सुमन दुबे आणि अन्य अर्धा डझन आरोपीही या प्रकरणात आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरणात आता आरोपपपत्र दाखल झाले असले तरी जवळपास १३ वर्षांपासून हे प्रकरण सुरू आहे. २०१२ मध्ये डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी पातियाळा हाऊस न्यायालयात एक तक्रार केली होती. त्यात यंग इंडिया लिमिडेट या कंपनीच्या माध्यमातून गांधी कुटुंबाने नॅशनल हेराल्डची दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील २ हजार कोटी रुपयांची संपत्ती हडपल्याचा आरोप केला होता.

केंद्रात संपुआचे सरकार असतानाच डॉ. स्वामी यांनी या प्रकरणाची तक्रार केली होती. योगायोग म्हणजे २६ जून २०१४ ला न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत चौकशीचा आदेश दिला. तोपर्यंत केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआचे सरकार आले होते. सोनिया गांधी यांना राजकारणात पदार्पण करून जवळपास २७ वर्ष होत आहे, या २७ वर्षांत त्यांच्यावर अनेक प्रकारचे आरोप झाले, पण आरोपपत्र मात्र हे पहिलेच आहे. विशेष म्हणजे सोनिया गांधी यांचा राजकारणातील सूर्य मावळत असताना त्यांच्यावर हे आरोपपत्र दाखल झाले आहे. राहुल गांधी यांच्यावर जवळपास दोन डझन प्रकरणात गुन्हे दाखल आहेत. मात्र त्यांच्याहीविरुद्ध दाखल झालेले हे पहिलेच आरोपपपत्र म्हणावे लागेल. या प्रकरणात शिक्षा झाली तर दोघांनाही आपली खासदारकी गमवावी लागणार आहे.

प्रियांका वढेरा यांच्याविरुद्ध सध्या एकही गुन्हा दाखल नसला तरी त्यांचे पती रॉबर्ट वढेरा यांच्याविरुद्ध मात्र दोन गुन्हे दाखल आहेत आणि दोन्ही गुन्हे भूखंड घोटाळ्याचे आहेत. ईडी सध्या रॉबर्ट वढेरा यांची जी चौकशी करत आहे, ते प्रकरण २००८ चे आहे. तेव्हा हरयाणात काँग्रेसचे सरकार होते आणि भूपेंद्रसिंह हुडा मुख्यमंत्री होते. गुरुग्रामच्या शिकोहपूर गावातील ३.५ एकर जमीन वढेरा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी लिमिटेडने ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून फेब्रुवारी २००८ मध्ये फक्त ७.५ कोटी रुपयांत विकत घेतली. काँग्रेसचे सरकार असल्यामुळे काही तासांतच या जमिनीचे म्युटेशन करण्यात आले. नंतर या जमिनीवर व्यावसायिक कॉलनी विकसित करण्याबाबतचे लेटर ऑफ इंडेंटही स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीला देण्यात आले. जून २००८ मध्ये ही जमीन वढेरा यांच्या कंपनीने ५८ कोटी रुपयांत डीएलएफ युनिव्हर्सल लिमिटेड या कंपनीला विकली . म्हणजे काही न करता चार महिन्यांत वढेरा यांच्या कंपनीने ७.५ कोटींच्या बदल्यात ५८ कोटी रुपये काही न करता कमावले. सप्टेंबर २०१८ मध्ये या प्रकरणात वढेरा, तत्कालीन मुख्यमंत्री हुडा अन्य काही लोकांविरुद्ध पोलिस तक्रार करण्यात आली.

बिकानेर भूखंड घोटाळ्यातही रॉबर्ट वढेरा आरोपी आहेत. बिकानेरच्या कोलायम भागात २७५ बिघा जमीन स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीने अशीच बेकायदेशीर पद्धतीने विकत घेतली. ही जमीन महाजन फिल्ड फायरिंग रेंजमुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी राखीव होती. ती जमीन वढेरा यांच्या कंपनीने राज्यात काँग्रेसचे सरकार असल्यामुळे हडपली. नंतर वाद वाढल्यावर राजस्थान सरकारला हा सौदा रद्द करावा लागला, त्यामुळे वढेरा यांच्या कंपनीने ही जमीन विकून टाकली. या प्रकरणात वढेरा यांच्यासोबत त्यांची आई मॉरिन वढेराही आरोपी आहेत. २०१५ मध्ये राजस्थान पोलिसांनी याप्रकरणी एफआयआर दाखल केला, नंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले. या प्रकरणात वढेरा आणि त्यांच्या आईविरुद्ध अटक वॉरंट काढण्यात आला. पण न्यायालयाने या अटकेला अंतरिम स्थगिती दिली. पाकिस्तानात बेनझीर भुत्तो यांचे पती आसिफ अली झरदारी यांची प्रतिमा मिस्टर टेनपरसेंट अशी तयार झाली होती. रॉबर्ट वढेरा यांची वाटचालही तशीच होती. सुदैवाने २०१४ मध्ये काँग्रेसचे सरकार जाऊन केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यामुळे रॉबर्ट वढेरा विविध राज्यांत आणखी जमिनी आणि भूखंड हडपू शकले नाही.

राहुल गांधींवर भ्रष्टाचाराच्या आरोपात दाखल झालेले हे पहिलेच आरोपपत्र असले तरी त्यांच्यावर मानहानीच्या प्रकरणात अनेक गुन्हे दाखल आहेत. २०१४ मध्ये राहुल गांधी यांच्यावर अशा प्रकारचा पहिला गुन्हा दाखल झाला, गांधी यांनी महात्मा गांधी यांच्या हत्येच्या प्रकरणात रा. स्व. संघाचा हात असल्याचा बिनबुडाचा तसेच खोडसाळ आरोप केला होता. या प्रकरणात त्यांच्याविरुद्ध भिवंडी न्यायालयात खटला सुरू आहे. २०१६ मध्ये त्यांच्यावर गुवाहाटी न्यायालयात असाच आणखी एक खटला दाखल झाला. २०१७ मध्ये पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणात राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा संघावर खोडसाळ आरोप केला, त्यामुळे त्यांच्यावर पुन्हा एकदा गुन्हा दाखल करण्यात आला. २०१८ मध्ये राहुल गांधी यांच्याविरुद्ध तीन गुन्हे दाखल करण्यात आले. पंतप्रधान मोदी तसेच भाजपा कार्यकर्त्यांविरुद्ध वादग्रस्त विधान केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध हे गुन्हे दाखल आहे, यातील दोन गुन्हे उत्तरप्रदेशात तर एक गुन्हा झारखंडमध्ये आहे. २०१९ मध्ये राहुल गांधी यांच्याविरुद्ध सर्वाधिक म्हणजे ५ गुन्हे दाखल झाले. सर्व चोर मोदी आडनावाचेच का असतात, असा अतिशय वाह्यात प्रश्न राहुल गांधी यांनी विचारला होता.

या प्रकरणात त्यांच्यावर दिल्ली, रांची, सुरत, पाटणा आणि अहमदाबादमध्ये पाच गुन्हे दाखल झाले. सुरतमधील प्रकरणात न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा दिल्यामुळे राहुल गांधी यांना २०२३ मध्ये आपले लोकसभा सदस्यत्व गमवावे लागले होते. खासदार म्हणून मिळालेले सरकारी निवासस्थानही त्यांना सोडावे लागले होते. २०२२ मध्ये राहुल गांधी यांच्यावर कॉपी राईट कायद्याचे उल्लंघन केल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. याचवर्षी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर अवमानजनक टिप्पणी केल्याच्या आरोपात गांधीवर लखनौमध्ये आणखी एक गुन्हा दाखल झाला,

२०२४ मध्ये राहुल गांधी यांच्यावर ४ गुन्हे दाखल करण्यात आले. भारत जोडो यात्रा आसाममध्ये असताना हिंसा भडकवण्याचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या वर्षी बंगळुरूत भाजपा कार्यकर्त्यांविरुद्ध वादग्रस्त विधान केल्याच्या प्रकरणात त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल गांधींविरुद्धचे सर्व गुन्हे हे बेताल बडबडीचे आहे. उचलली जीभ लावली टाळूला या पद्धतीने बोलत राहुल गांधी स्वतःला आणि काँग्रेस पक्षलाही अडचणीत आणत असतात. तरीपण त्यांना शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### सडलेल्या मेंदूचा माणूस

मंगळवारी पहलगाम येथे इस्लामी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या नृशंस हल्ल्यासंदर्भात विश्वप्रवक्ते संजय राऊत यांनी जे अकलेचे तारे तोडले आहेत, त्यात त्यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारने काश्मीरवर स्वतःचं नियंत्रण ठेवण्यासाठी काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० हटवलं, जम्मू-काश्मीरला केंद्रशासित प्रदेश बनवलं. त्यामुळे काल पहलगाममध्ये जो दहशतवादी हल्ला झाला त्याची पूर्ण जबाबदारी ही केंद्र सरकारची आहे!. ३७० कलम हटविण्याआधीही दहशतवाद्यांच्या अशा कारवाया चालूच होत्या, हे विद्वान राऊत यांना माहीत नाही का? गृहमंत्री अमित शाह यांच्यावरदेखील त्यांनी गरळ ओकली आहे. यावरून हे स्पट दिसून येते की, संजय राऊत हा विकृतीने पछाडलेला, वैफल्यग्रस्त आणि सडलेल्या मेंदूचा माणूस आहे. फडणवीस सरकारने त्यांच्या सुरक्षेत वाढ करावी, अन्यथा या राऊतांना देशभक्तांकडून चोप मिळण्याची शक्यता आहे. त्यांचे पक्षप्रमुख आणि पक्षप्रमुखांचे चुलतबंधू सध्या हवा खाण्यासाठी परदेशात पर्यटनासाठी गेले आहेत, येथील हवा त्यांना मानवो!

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३


### आई-बाबा : आयुष्याचे चॅट-जीपीटी

आपल्या आयुष्यात रोज नवनवीन प्रश्न निर्माण होतात. शालेय अभ्यासापासून करीअरच्या निर्णयांपर्यंत, दैनंदिन समस्यांपासून जीवनमूल्यांपर्यंत. या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधायला आज आपण चॅट-जीपीटीसारख्या तंत्रज्ञानाकडे धाव घेतो. पण विचार करा, आपल्याकडे हे सगळं आधीपासूनच होतं- ते म्हणजे आई-बाबा. आई-बाबा हेच खरं तर आपल्या आयुष्याचे चॅट-जीपीटी आहेत. एक असा मार्गदर्शक स्रोत, जो नेहमी उपलब्ध असतो, निःस्वार्थपणे, कायम आपल्या भल्यासाठीच उत्तरं देणारा. आपल्याला काही हवं असेल, एखादी गोष्ट समजून घ्यायची असेल, निर्णय घ्यायचा असेल तर आपण अगोदर आई-बाबांकडेच जातो. आपल्याला माहीत असतं, त्यांच्या उत्तरात अनुभवाचं वजन आहे, प्रेमाची जोड आहे आणि चुकू न देण्याची नितांत काळजी आहे. लहानपणापासून आजवर शाळेची तयारी असो की जीवनातला पहिला मोठा निर्णय, आईबाबा कायम आपल्या पाठीशी उभे राहिले आहेत. त्यांनी आपल्याला चालायला शिकवलं, पण चालताना ठेचकाळल्यावर त्यांनीच उचलून पुन्हा चालायला शिकवलं. त्यांनी आपली स्वप्नं ओळखली, कधी मार्ग दाखवला तर कधी मार्गातले काटे स्वतःच्या हाताने दूर केले.

उदाहरणच घ्या, सणवार आले की, आपल्याला सगळं माहिती असतं का? गुढीपाडवा, दिवाळी, संक्रांत, होळी... कुठल्या दिवशी काय करायचं, काय बनवायचं, कुठल्या पद्धतीने पूजा करायची? हे सगळं कोण सांगतं? आपली आईच ना! तिच्या हातच्या चविष्ट पदार्थांपासून ते तिच्या आठवणींच्या गोष्टींपर्यंत सणाला खरी रंगत येते आणि बाबा ते तर नेहमी आपल्या मागे उभे, सगळं व्यवस्थित पार पाडण्यासाठी, घरात गोंधळ न होता उत्सव साजरा व्हावा यासाठी धावपळ करीत असतात. चॅट-जीपीटी माहिती देतो, पण आई-बाबा समजून घेतात. एकदा आई-बाबांशी शांतपणे बोलून बघा. कदाचित उत्तरं आधीच त्यांच्या डोळ्यांत लपलेली असतील.

**अनुश्री पातूरकर**/९६०७१३६७५७

### बुडत्याचा पाय खोलात



महाराष्ट्रात भाजप विजयी झालाच कसा? : राहुल गांधी, ही बातमी वाचून करमणूक झाली आणि संतापही आला. राहुल गांधी ही राजकारणातील अत्यंत अडाणी, बालिश, अहंकारी, उर्मट आणि तिरस्करणीय व्यक्ती आहे, हे काँग्रेसचे नेतेही जाणून आहेत. पण तरीही नाईलाजाने त्यांना राहुल गांधींशिवाय पर्याय उपलब्ध नाही हे सुद्धा त्यांना ठावूक आहे. आपला पक्ष सातत्याने पराभूत होतो आहे आणि आपल्याच नेतृत्वाखाली पक्षाने नव्वदहून अधिक निवडणुकांत पराभवाची चव चाखली आहे याचे काहीही वैषम्य त्यांना वाटत नाही. आपला तोंडाळपणा, वाचाळपणा आणि आपला गर्व पक्षासाठी घातक ठरतो आहे हे त्यांच्या गावीही नाही.

विदेशात जाऊन भारताची, लोकशाहीची, भारतीय संस्थांची यथेच्छ बदनामी करणे, हा राहुल गांधींचा आवडता छंद आहे. त्यांच्यात असे कोणते गुण दिसले म्हणून या विदेशी संस्था त्यांना भाषण करण्यास बोलावतात हे ठावूक नाही. मात्र अशी बदनामी करताना ते सारासार विचार करत असल्याचे कधीही, कोठेही जाणवत नाही. भारतातील निवडणूका जिंकणे एवढे सोपे असते तर भाजप आणि निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीत भाजपला एकहाती बहुमत दिले नसते का? महाराष्ट्रातील निवडणुकीत उबाठा सेना, राशप गट यांचे धुरंधर नेते त्यांना सोडून गेलेले असताना आणि महाराष्ट्रात काँग्रेसचे नगण्य अस्तित्व असताना आपल्याला सत्ता मिळेल, ही अपेक्षा करणेच बालिशपणाचे होते. मात्र पराभव खुल्या दिलाने स्वीकारण्याची तयारी नसल्यामुळे आणि केलेल्या चुकांवर आत्मपरीक्षण करण्याची पद्धत नसल्यामुळे काँग्रेसचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सहानुभूतीच्या लाटेवर निवडणुका जिंकण्याचा काळ इतिहासजमा झाला आहे हे काँग्रेसने लक्षात ठेवले पाहिजे.

**शिवराम वैद्य**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विवेक जॉन्सन यांनी स्विकारला बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

बीड जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जान्सन यांनी आज पदभार स्विकारला. श्री. जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.

अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे.

त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

अल्पपरिचय

पलक्कड येथील एनएसएस महाविद्यालयातून यांत्रिकी अभियंता परिक्षा उत्तीर्ण

२०१६ साली भारतीय महसूल सेवा (आयआरएस) व नंतर २०१८ साली भारतीय प्रशासन सेवेत रुजू

स्मार्ट आरोग्य केंद्र उभारणीत एकूण ३२ आरोग्य केंद्र अद्यावत केले.

मिशन 'सक्षम'अंतर्गत खगोल प्रयोगशाळा तसेच ८ विज्ञान उद्यानांची उभारणी

जिवनोन्नती अंतर्गत बचतगटांसाठी १० विशेष मॉलची उभारणी

ग्रामसडक अंतर्गत ५००० किमी रस्ते बांधणी

ग्रामीण भागात पर्यटन विकास कार्य तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी १६ कृषी माल

गोदामांची उभारणी

पुरस्कार

उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाच्या बालस्नेही पुरस्काराचे मानकरी

लोकाभिमूख कार्याबद्दल 'महाराट्रीयन ऑफ द इअर २०२३' पुरस्काराने गौरव

ग्रामीण जीवनात,अर्थव्यवस्था आणि मुलभूत सुविधा उभारणीसाठी 'स्कॉच पुरस्कार'

# मोबाईल ॲपद्वारे १०० टक्के ई पीक पाहणी पूर्ण करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

राज्यात उन्हाळी हंगाम २०२५ पासून ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी करण्यात येणार आहे.

दिनांक १ एप्रिल २०२५ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये उन्हाळी हंगाम २०२५ सुरू करण्यात येत आहे या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहाय्यक स्तरावरून मोबाईल प द्वारे पिकाची नोंदणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे

शेतकरी स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १ एप्रिल २०२५ ते १५ मे २०२५. सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १६ मे २०२५ ते २९ जुन २०२५

उन्हाळी हंगाम २०२५ ची १०० टक्के ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲपद्वारे पूर्ण करावयाची आहे. दिनांक २२. ४. २०२५ च्या दैनिक अहवालाच्या अवलोकन केले असता ०.०८ टक्के क्षेत्राची पीक नोंदणी झाल्याचे दिसून येते.त्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून उन्हाळी हंगाम २०२५ ची शेतकरी व सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व (DCS) मोबाईल प द्वारे विहित कालावधी १०० टक्के पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत.

# दुचाकी आडवी लावून भररस्त्यात लुटले

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर कासार दि.२४ एप्रिल**

तालुक्यातील खालापुरी शिवारात तीन जणांनी दुचाकी आडवी लावत एकाला (दि.१८) शुक्रवार रोजी सायंकाळी सातच्या सुमारास लुटल्याची घटना घडली असून ६१,००० हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याप्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्जुन भाऊराव धांडे (वय ६५) रा.लिंबा हे दुचाकीवरून गावी जात असताना शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी शिवारात तोंड ओळख असलेल्या तीन जणांनी दुचाकीला धक्का देऊन खाली पाडत खिशातील रोख रक्कम व सोन्याची अंगठी असा एकूण ६१,००० हजारांचा मुद्देमाल लंपास लंपास केल्याची घटना (दि.१८) शुक्रवार रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली असून अर्जुन धांडे यांच्या फिर्यादीवरून (दि.२३) बुधवार रोजी तीन जणांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बोरदेवीत अखंड हरिनाम सप्ताह व श्री गणेश विठ्ठल रुक्मिणी व महादेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश रोहन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील मोजे बोरदेवी नवापूर या गावी अखंड हरिनाम सप्ताह व श्री गणेश विठ्ठल रुक्मिणी व महादेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश रोहन सोहळ्याचे आयोजन दिनांक २२ एप्रिल ते २९ एप्रिल २०२५ च्या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे

या सप्ताहात महाराष्ट्रातील ह भ प विष्णु महाराज शेंडगे व त्यांचे समवेत ह भ प सुमंत महाराज डाके यांचे ७ दिवस गायन व भजन होईल होईल व यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य ह भ प महेश महाराज लोणकर ह भ प जगन्नाथ महाराज कराळे ह भ प ओंकार महाराज वनवे हभप रखमाजी बापू शिंदे हे सात दिवस उपस्थित राहतील. महाराष्ट्रातील तथा बीड जिल्ह्यातील बीड नामवंत कीर्तनकार यांची उपस्थिती लाभणार आहे यामध्ये दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी ह भ प रामायणाचार्य श्री बाबासाहेब मुंडे यांचे कीर्तन दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी हभप रामायणाचार्य श्री हनुमंत महाराज डांबे यांची रात्री कीर्तन. २४ एप्रिल २०२५ रोजी हभप भागवताचार्य श्रीराम महाराज चोले दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी श्री ह भ प युवा कीर्तनकार गोविंद महाराज नाईकवडे खेरडा . याच दिवशी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी ह भ प परमपूज्य गुरुवर्य श्री आत्माराम महाराज शास्त्री नीचे बोध आश्रम दत्त संस्थान लिंबा रुई देवी यांच्या हस्ते सर्व मूर्तीचा कलश रोहन सोहळा व पूजा होणार आहे . दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी ह भ प श्री भागवताचार्य दत्ता महाराज गिरी यांचे रात्री कीर्तन. दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी ह भ प कल्याण महाराज देवडकर यांचे रात्री कीर्तन. दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी विनोदाचार्य ह भ प श्री कृष्णा महाराज राऊत यांचे रात्री नऊ ते ११ या दरम्यान कीर्तन होईल. २९ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार तथा भागवताचार्य श्री गोपाळ महाराज थोटे यांची शेवटच्या दिवशी सकाळी दहा ते एक काल्याचे किर्तन होईल. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये काकडा आरती भजन जागर भारुडे कलश रोहन मिरवणूक विविध शास्त्रानुसार पूजा ब्राह्मणाच्या साक्षीने गावकरी पूजेचा मान घेत आहेत श्री केसापुरी परभणी येथील अनुभवी ज्योतिष्यकार श्री सखाराम देवा पाठक व त्यांचे समवेत विविध ब्राह्मण यांची उपस्थिती लाभत आहे तसेच आसपासच्या जवळच्या गावातील बोरदेवी नवापूर पाटेगाव लिंबा रुई बेडकुचीवाडी मोरयाची वाडी शिर्डी थोट परभणी केसापुरी ढोरवाडी ताडसोन्ना पिंपळनेर यासह आदी गावातील वेळेनुसार सामुदायिक भजनी होतील शेवटच्या दिवशी विविध ग्रंथाची वाजत गाजत लेझीमच्या साह्याने मिरवणूक काढण्यात येईल असे गावकऱ्यांच्या वतीने कळविण्यात आले आहे तरी या बीड जिल्ह्यातील वारकरी व संप्रदायातील आणि भाविक भक्तांनी उपस्थित राहून त्या अखंड हरिनाम सप्ताह शोभा वाढवावी व महाप्रसादाचा लाभ घ्यावा घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे व शेवटचा महाप्रसाद गावचे नवनिर्वाचित सरपंच रवींद्र आरसूळ व मुगाव येथील कल्याणराव दुबाले यांची महापंगत सर्व भक्तांसाठी होत आहे.

# पहलगाम हल्ल्याचा दुखवटा म्हणून बीड येथील भीमगीतांचा कार्यक्रम रद्द

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूद्ध वनकर यांचा कार्यक्रम दि.२५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. याचा दुखवटाम्हणून जयंती उत्सव समितीकडून भीमगीतांचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे साजरी केली जाते. याहीवर्षी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ एप्रिल २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूध्द वनकर यांचा भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भारतातील विविध भागांतून पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांवर भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले. ही घटना अत्यंत दुःखद आहे. त्यामुळे बीड येथील भीमगीतांचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीकडून घेण्यात आला आहे. याबाबत जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.सिध्दार्थ शिंदे यांच्याकडून माहीती देण्यात आली आहे.

# जवळबन सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक बिनविरोध

## गावकऱ्यांच्या समन्वयातून राजकारण

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ एप्रिल**

तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक गावकऱ्यांच्या समन्वयातून बिनविरोध करण्यात आली.पार्टी पक्ष संघटना वारंवार संघर्ष उभा राहतो. यावेळी गावकऱ्यांनी एकत्र येत योग्य उमेदवारांची निवड करून सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाली. याबद्दल सर्व सदस्यांचे अभिनंदन केले जातात.



दीड वर्षांपूर्वी मुदत संपलेली सोसायटीची निवडणूकिवर बहिष्कार टाकल्यामुळे प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती. एक एप्रिल रोजी सुरू झालेल्या निवडणूक प्रक्रियेचा उमेदवारी माघार मुदत २३ एप्रिल रोजी झाली. निवडणूक निर्णय अधिकारी मालती वहावळे यांनी बिनविरोध सदस्य यांचे निकालपत्र दिले.भाकरे नितीन अर्जुन, करपे प्रवीण चंद्रकांत ,करपे दिगंबर बबन, करपे शिरू ज्ञानोबा, गायकवाड कैलास महादेव, गायकवाड दशरथ शहाजी, करपे अर्जुन हरिभाऊ, भाकरे बालासाहेब पांडुरंग, करपे शोभा अशोक, पारेकर करुणाबाई शिवाजीराव, जोगदंड एकनाथ चंदाआप्पा, घाडगे गोवर्धन वैजनाथ ,करपे गणेश विठ्ठलराव हे उमेदवार बिनविरोध निवडून आले.

# तहसीलदार तसेच नगरपरिषद क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

मान्सून कालावधीमध्ये बीड जिल्हयातील अनेक गावांना दरवर्षी मोठया प्रमाणत नैसर्गिक आपत्तीचा धोका संभवतो. अचानक नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास मदत कार्यात मोठा अडथळा निर्माण होतो अपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून प्रत्येक गावामध्ये मतदकार्य शक्य व्हावे यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने जिल्हयातील सर्व तहसीलदार तसेच नागरपरिषद क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप केले असल्याचे जिल्हा अपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड यांनी कळविले आहे.

बीड जिल्हयात एकूण ६३ पुरप्रवण गावे आहेत या गावांना मान्सुन कालावधीमध्ये विविध नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तेथे आपत्ती व्यवस्थापन किट असणे आवश्यक आहे. यावर्षी पावसाळ्यापूर्वी सर्व पुरप्रवण गावांना आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व साहित्य उपलब्ध रहावे यासाठी शोध व बचाव साहित्य पंचायत समिती स्तरावर रवाना केले आहे.

किटमध्ये काय असेल?

आपत्ती किटमध्ये प्रथोमचार पेटी, लाईफ बॉय, लाईफ जॅकेट, एलइडी टॉर्च, चैन सॉ, रिपेलिंग रोप, स्ट्रेचर, सेफटी बुट, वॉकी टॉकी, रेनकोट यांचा समावेश आहे. या सर्व वस्तु आयएसआय मार्क असलेल्या दर्जेदार आहेत.

# प्रलंबित तक्रारीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ ५ मे रोजी १२.०० ते २.०० पर्यंत उपस्थित रहावे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय येथे दि. ५ मे २०२५ रोजी दुपारी १२.०० ते २.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनानिमित्त आयोजन करण्यात आले आहे.

ज्या अर्जदारांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या तक्रारी मांडावयाच्या आहेत त्यांनी तक्रार अर्ज घेऊन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन नगर रोड बीड, ४३११२२ या ठिकाणी स्वत: उपस्थित रहावे, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या) चे व्यवस्थापक यांनी केले आहे.

# शुक्रवारी बीडमध्ये मोफत मूळव्याध तपासणी शिबिर

## महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मूळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे होणार आहे. शिबिरातील रुग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे. मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मूळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिणाम भविष्यात रुग्णांना सहन करावे लागतात.

सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध-भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्प्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदना होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकाराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो.

# आदित्य शिक्षण संस्थेत राबवली जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ एप्रिल**

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस .ई. बी. सी. (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचे वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून 'समता पंधरवडा' या विशेष मोहिमेचे आयोजन बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत करण्यात आले होते.

'समता पंधरवडा' कालावधी १ ते १४ एप्रिल दरम्यान राबवण्यात आला. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणे साठी विशेष मोहिम राबवण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमाला संगणक विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख, कार्यालयीन अधीक्षक जात पडताळणी कार्यालय बीडचे गणेश शेजाळ, प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे, समतादूत बार्टीचे ज्ञानोबा गुजर, सहाय्यक जातपडताळणी कार्यालय बीड च्या साधना मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी गणेश शेजाळ यांनी महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या योजना जसे की स्वाधार योजना,पंडीत दीनदयाल स्वयम् योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मण तांबे यांनी मानली. यावेळी प्रा. सलीम शेख,प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. अजय दुधाळ, प्रा. पी. आर. अ,प्रा. अक्षय राऊत, प्रा. शिवानी जाधव, प्रा. मिन्हाज शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम पवार, प्रा. प्रियंका नागरगोजे यांनी परिश्रम घेतले.

महाविद्यालयात जात वैधता प्रमाणपत्रासाठी शिबिर- प्रकल्प अधिकारी ज्ञानोबा मात्रे

प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे म्हणाले की, अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस ई बी सी (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येत आहे. त्याकरिता संबंधित मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज लर्रींळशींरश्रळवळीूं.ारहरीरीहींर.सेीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने भरून सदर अर्जाची हार्ड कॉपी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेकडे सादर करावेत. तसेच बीड जिल्हयातील काही महाविद्यालय ामध्ये समितीमार्फत शिबिरे आयोजित करण्यात आलेले असून त्याच ठिकाणी संबंधित अर्ज स्वीकारून त्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निशुल्क प्रशिक्षण- संजय गुजर

बार्टीचे अधिकारी संजय गुजर म्हणाले की, बार्टी मार्फत एससी, एसटी विद्यार्थ्यांना एमपीएससी, युपीएससी, आयबीपीएस, जी, नीट, ऋळए-ढजएऋड, ई घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा करिता 'विना शुल्क अनिवासी प्रशिक्षण' आणी अभ्यास सामग्री दिली जाते. त्याचबरोबर ठरावीक असे प्रती महा विद्या वेतनही पुरवले जाते. तसेच पूर्व परीक्षा पास होऊन मुख्य परीक्षेस पात्र ठरल्यास ठरावीक 'लोकसेवा आयोग व नागरी सेवा परिक्षा' प्रमाने आर्थीक मदत दिली जाते. त्या संदर्भात तज्ज्ञ व्यक्ती मार्फत मार्गदर्शन पुरवले जाते. तसेच महा ज्योती मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास - प्र वर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी या हेतूने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, JEE/ NEET/MHT-CET, MPSC, UPSC आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते.

# ईटकुर जोड रस्त्यावरील १५८ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ एप्रिल**

तालुक्यातील रामा ५२ ते ईटकुर - शिंपेगाव - लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वरील १५८.१३ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु असून दळणवळणाची साधने निर्माण झाल्यास या भागाचा विकास होण्यास मदत होईल असे प्रतिपादन अमरसिंह पंडित यांनी केले. विकासाची दृष्टी अमरसिंह पंडित यांच्याकडे असल्यामुळे तेच या भागाचा विकास करू शकतील असे प्रतिपादन यावेळी ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी केले. व्यासपीठावर शिंपेगाव येथील दत्त संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ईटकुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाला माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला.

गेवराई विधानसभा मतदार संघात अतिशय दर्जेदार विकासकामे सुरु आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला जात आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ५२ ते ईटकुर - शिंपेगाव - लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वर १५८.१३ लक्ष रुपये किंमतीच्या पुल बांधकामाचा शुभारंभ बुधवार, दि.२३ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, दत्त संस्थान, शिंपेगावचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी, ह.भ.प. धुराजी बाबा, ह.भ.प. करांडे महाराज, मादळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, आहेरचिंचोलीचे सरपंच विकास रकटे, माजी पं.स.सदस्य जयसिंग जाधव, दत्ता भोजगुडे, माजी सरपंच अरुण वाघमारे, उपअभियंता पोपटराव जोगदंड, नितीन विर यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ईटकुर येथे सुरु असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी सुसंवाद केला, यावेळी त्यांनी ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले.ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम केल्यानंतर या भागातील विकास होऊ शकेल म्हणून जाणीवपूर्वक ग्रामीण रस्ते दर्जेदार करण्याचा प्रयत्न सुरु आहे. राष्ट्रीय महामार्ग ५२ पासून ईटकुर, शिंपेगाव व लोळदगाव पर्यंत रस्त्याचे काम मंजुर असले तरी भविष्यात हा रस्ता सिरसमार्ग पर्यंत जोडला जाईल त्याचबरोबर कामे दर्जेदार होतील असे प्रतिपादन जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी यावेळी केले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ‘तुळजाभवानी’त नशा मुक्ती जनजागृतीसाठी चित्रकला, घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागाच्या वतीने नशा मुक्तीच्या जनजागृतीसाठी चित्रकला आणि घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हा होता. या स्पर्धेचे आयोजन संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डी.जे वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेमध्ये द्वितीय वर्ष संगणक विभागातील विद्यार्थिनी हंगरगेकर वैष्णवी आणि फेरी रोहिणी यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय पारितोषिक पटकावले.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश रांजणकर यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना नशेपासून दूर राहण्याचे आवाहन करत, समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यास प्रेरित केले.

## संक्षिप्त वृत्त...



### भाजपा परंडा तालुकाध्यक्षपदी अरविंद रगडे

**परंडा, दि.२४ एप्रिल -**

भारतीय जनता पार्टीची भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक होऊन परंडा तालुका अधयपदी अरविंद रगडे यांची तर परंडा शहर अध्यक्षपदी उमाकांत गोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. भाजपा परंडा शहर व ग्रामीण मंडल अध्यक्ष निवडीकरिता भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हा निवडणूक निरीक्षक गुरूनाथ मगे व परंडा शहर व ग्रामीण मंडल निवडणूक निरीक्षक प्रभाकर मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.२० एप्रिल रोजी परंडा येथे भाजपा संपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. यावेळी या बैठकीस भाजपा मावळते तालुका अध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य व अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. जहीर चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, विकास कुलकर्णी, सुजित परदेशी यांच्यासह आदि उपस्थित होते.

### आशिष दामले यांचा नळदुर्ग दौरा

**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅ.आशिष दामले (राज्य मंत्री दर्जा) हे येत्या



२६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ऐतिहासिक नळदुर्ग शहरात महामंडळ संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. याच अनुषंगाने नळदुर्ग येथील श्री. मल्लिकार्जुन मंदिर सभागृहात ब्राह्मण समाजाच्या वतीने भव्य असा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. या कार्यक्रमात समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे व अन्नत्याग करून सरकारचे लक्ष वेधुन घेणारे दिपक भाऊ रणनवरे हे ही उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमात महामंडळ संदर्भात सविस्तर मार्गदर्शन होणार आहे.

### अतिक्रमण काढून रस्ता लांबविण्याची मागणी

**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात येत असलेल्या नळदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्ग ते मैलारपुर येथील खंडोबा मंदिरापर्यंतच्या सिमेंट रस्ता व गटार बांधण्याच्या कामात अडथळा ठरत असलेले सर्व अतिक्रमण काढुन अंदाज पत्रकामध्ये जेवढी रस्त्याची लांबी रुंदी आहे तेवढा रस्ता करावा, अशी मागणी शहर वासियांनी केली आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन सध्या नळदुर्ग शहरात कोट्यावधी रुपये खर्चाची रस्ता गटार बांधण्याची कामे सुरु आहेत. यातील महामार्ग पोलिस केंद्रासमोरील राष्ट्रीय महामार्ग ते मैलारपुर येथील खंडोबा मंदिर आणि नळदुर्ग-तुळजापुर रस्त्यावरील जालशुद्धिकरण केंद्र ते मैलारपुर येथील श्री खंडोबा मंदिर या दोन प्रमुख रस्त्यांचा समावेश आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कुठल्याही दबावाला भीक न घालता जे अतिक्रमण या रस्त्याच्या कामात अडथळा ठरत आहे ते काढुन या रस्त्याचे काम करावे, अशी मागणी नळदुर्ग शहरातील नागरीकांनी केली आहे.

### ग्रामसेवक व सरपंच कार्यशाळा संपन्न

**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेबाबत जनजागृती, अंमलबजावणीसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळांमध्ये संबंधित तालुक्यांतील ग्रामसेवक व सरपंच यांना योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी तहसीलदार निलेश काकडे, गटविकास अधिकारी मोहन राऊत, प्रभाकर महामुनी, नानासाहेब लांडगे, अधिकारी टी.पी.हनवते, जयकुमार जैन, जयघोष जैन, अशोक पवार, सुनीलकुमार डुंगरवाल उपस्थित होते.

# विद्युत महामंडळाच्या हलगर्जीपणामुळे सर्विस रोडची कामे रखडली

▶▶ विद्युत महामंडळाकडून लाईन ट्रान्सफरसाठी टाळाटाळ... ▶▶ विद्युत खांब आणि तारांमुळे रस्ता विकास कामे लांबणीवर ... ▶▶ भिजत घोंगडे विद्युत महामंडळाच्या अंगावर...





**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

धाराशिव आणि नळदुर्ग रस्त्याच्या सर्विस रोडची कामे अनेक वेळा पीडब्ल्यूडीने पत्रव्यवहार करूनही विद्युत वितरण महामंडळाच्या हलगर्जीपणामुळे रखडले आहेत. विद्युत महामंडळाच्या मनमानी कारभाराचा अनेक वेळा शहरातील नागरिकांनी निवेदन आणि उपोषणाद्वारे निषेध केला आहे.

निर्लज्जाचा कळस ओलांडलेल्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा कामात असणारा हलगर्जीपणा अनेकदा चव्हाट्यावर आला असून विद्युत महामंडळाचे अधिकारी कर्मचारी कोणालाही जुमानत नसल्याच्या चर्चा शहरात सर्रास ऐकण्यास मिळत आहे.

नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत शहरात डीपी रस्त्याची सिमेंट काँक्रेट रस्ते आणि पक्कीनालीचे १५८ कोटींचे विविध रस्ते विकास कामे चालू होती पण बजेट नसल्याने सध्या हे कामे रखडली असून मागील दीड दोन महिन्यापासून हे काम घेतलेली के एच कंट्रक्शन कंपनीचा ठेकेदार अर्धवट कामे सोडून गायब आहे.

त्यामुळे शहरात या योजनेतून चालू असलेले कामे अर्धवट स्वरूपात ठेवून बंद पडले आहेत. पीडब्ल्यूडीला याबाबत विचारणा केली असता त्यांनी विद्युत महामंडळ यांच्याशी अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही ते सर्विस रोडला अडथळा होत असलेली विद्युत लाईन ट्रान्सफर करत नाहीत.

असे सांगून त्यांच्या अंगावरील घोंगडे विद्युत महामंडळाच्या अंगावर टाकून मोकळे झाले आहेत. सध्या धाराशिव आणि नळदुर्ग रोडला सर्विस रोड नसल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. दोन्हीही रस्त्यावर नेहमीच छोटे-मोठे अपघात घडत असतात. सर्विस रोड झाल्यानंतर या दोन्ही रोडवर होणाऱ्या अपघातावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण होण्यास मदत होईल.

विद्युत महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केवळ तीन महिन्यात लाईन ट्रान्सफर करून सर्विस रोड रिकामा करण्याचे आश्वासन दिले पण अजून काम चालू केले नाहीत. विद्युत महामंडळ आणि पीडब्ल्यूडी कडून एकमेकाकडे बोट करून वेळ मारून नेण्याचे काम केले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. दोन्ही प्रशासनाच्या टोलवाटोलवीमुळे शहराचा विकास मात्र खुंटला आहे.

### सर्विस रोडवर अतिक्रमणे करून भाडे वसुली

नळदुर्ग आणि धाराशिव रोडवर होणाऱ्या सर्विस रोडवर पाठीमागे असणाऱ्या घरांनी व प्लॉट धारकांनी रोड लेवलने मुरूम टाकून त्यावर अतिक्रमण करून दुकाने, शॉपिंग सेंटर काढली आहेत. नगरपरिषदेच्या जागेवर अतिक्रमण धारकांकडून मोठ्या प्रमाणात भाडे वसुली केली जात असून याकडे नगरपरिषद प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. नगरपरिषदेला अतिक्रमणे हटवून सर्विस रोड करण्यासाठी अडथळा येणारे अतिक्रमण काढण्याबाबत अनेक वेळा पीडब्ल्यूडीने पत्रव्यवहार करूनही नगरपरिषद प्रशासन अतिक्रमणे काढण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

### पुढच्या महिन्यात काम चालू करणार

सध्या विद्यार्थ्यांच्या एमटीएसीच्या परीक्षा असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या पत्रामुळे आम्ही काम थांबवले असून पुढच्या महिन्यात हे काम चालू करणार आहोत. काम करताना लाईट बंद ठेवावी लागते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नुकसान होते जिल्हाधिकारी यांचे पत्र येण्यापूर्वी दिवसभरात काही टप्पे करून लाईट बंद ठेवून हे कामे करण्याचे नियोजन केले होते.

**- व्ही.जे.सूर्यवंशी,** उपअभियंता विद्युत वितरण महामंडळ तुळजापूर

# तुळजापूर कृउबा समितीला राज्यात १९ वा व जिल्ह्यात पहिला क्रमांक

▶▶ मा. बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्पांतर्गत उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

तुळजापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत १४०.०५ गुण मिळवून राज्यात १९ वा क्रमांक, तर धाराशिव जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवून एक मानाचा ठसा उमटवला आहे. ही माहिती बाजार समितीचे सभापती ॲड. आशिष सोनटक्के यांनी दिली आहे.

या यशामध्ये आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असून, त्यांच्याच नेतृत्त्वाखाली बाजार समितीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, असेही सभापती ॲड. सोनटक्के यांनी सांगितले.

प्रकल्प संचालनालय, पुणे यांनी २०२३-२४ या वर्षासाठी राज्यातील एकूण ३०५ बाजार समित्यांची क्रमवारी जाहीर केली असून, त्यामध्ये तालुका बाजार समितीने १९ वा क्रमांक पटकावला आहे. ही कामगिरी मुख्यत्वे पायाभूत सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, तसेच इतर निकषांवर आधारित आहे.





आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे संचालक मंडळ अधिक प्रभावीपणे कार्य करू शकले. येत्या काळात आणखी उत्कृष्ट कार्य करत तुळजापूर बाजार समिती राज्यातील आदर्श व नमुनेदार बाजार समिती म्हणून उभी राहील, असा विश्वासही सभापती ॲड. आशिष सोनटक्के यांनी व्यक्त केला.

# समर्थ अर्बन को. ऑप. बँक लि.च्या अध्यक्षपदी ॲड. व्यंकट गुंड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

समर्थ अर्बन को. ऑप. बँक लि. धाराशिव या बँकेच्या अध्यक्षपदी ॲड. व्यंकट गुंड तर उपाध्यक्ष पदी ॲड. निवृत्ती कुदळे यांची निवड झाल्याबद्दल समर्थ अर्बन को. ऑप. बँक लि. धाराशिवच्या वतीने सत्कार करण्यात आला. ही निवड सहकारी संस्थेचे प्राधिकृत अधिकारी डॉ माधव अंबिलपुरे, कक्ष अधिकारी डी. ये. जाधव सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. तद्पूर्वी पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात जे लोक मृत्युमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी बोलताना ॲड. व्यंकट गुंड यांनी रुपामाता उद्योग समूहाने शेतकरी व ठेवीदारांच्या मनामध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. तसेच अल्प कालावधीमध्ये ठेवीदारांच्या विश्वासाला पात्र राहून उत्तम कार्य चालत असल्यामुळे आपण समर्थ अर्बन को. ऑप. बँकेच्या भविष्यातील प्रगतीसाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन त्यांनी दिले. आईच्या निधनानंतर आपण चांगल्या कार्याच्या रुपाने आईची सतत आठवण राहावी म्हणून स्थापन केलेल्या सर्वच उपक्रमाला ठेवीदार सभासद व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य मिळत असल्यामुळे मी हे करू शकल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात जसे संपूर्ण जिल्ह्यात व जिल्हयाबाहेर रूपामाता समूहाचे नवलोकिक आहे तसेच नाव आपण समर्थ अर्बन को. ऑप. बँकेचे करू व त्याचे जाळे जिल्ह्याभरात पसरवू असेही बोलताना ॲड. व्यंकट गुंड म्हणाले. समर्थ अर्बन को. ऑप. बँक लि. धाराशिव ही रूपामाता समुहामध्ये विलीन झाल्याबदल ॲड. व्यंकट गुंड यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, अशोक पाटील, रामदास कोळगे, रूपामाता समूहाचे कार्यकारी संचालक अजित गुंड, कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, धनंजय कुलकर्णी, शरद गुंड, विशाल गुंड, व्यंकट मरगणे आदी सभासद, ठेवीदार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# दोन वर्षाचे जिल्हा युवा पुरस्कार जाहिर; १ मेला पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जिल्ह्यातील युवा व नोंदणीकृत संस्थांनी समाजहितासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी क्रीडा विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या जिल्हा युवा पुरस्कार २०२३-२४ आणि २०२४-२५ यांची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम (युवक/युवतीसाठी १० हजार रुपये, संस्थेसाठी ५० हजार रुपये) असे आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा युवा पुरस्कार समितीचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली २४ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत पुरस्कारार्थींची निवड अंतिम करण्यात आली.



बैठकीस विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सन २०२३ -२४ चे पुरस्कारार्थी हे पुढीलप्रमाणे आहेत. युवक : गणेश विक्रम मुळे (रा. मुळेवाडी), युवती : डॉ. गौरी विजय बागल (तांबरी विभाग), धाराशिव संस्था : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सारोळा (बु.), धाराशिव.

सन २०२४-२५ चे पुरस्कारार्थी युवक : विकास शंकर लोभे (रा. कानेगाव, ता. लोहारा), युवती : श्रीमती अस्मिता रमेश शिंदे (मु. पो. शिंगोली), धाराशिव संस्था : श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गोजवाडा (ता.वाशी), धाराशिव हे आहेत.

या पुरस्कारांचे वितरण १ मे २०२५ रोजी, महाराष्ट्र दिनानिमित्त, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी व सचिव, जिल्हा युवा पुरस्कार समिती श्रीकांत हरनाळे यांनी दिली.

# उमरगा-लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदानासाठी २९ एप्रिलला लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन

▶▶ ८६ कोटी ४६ लाख रुपयांच्या प्रलंबित मदतीसाठी आंदोलनाची हाक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

उमरगा लोहारा तालुक्यातील प्रलंबित अतिवृष्टी अनुदान ८६ कोटी ४६ लाख रुपये शेतकऱ्यांना मिळण्यासाठी २९ एप्रिल रोजी लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी दिली आहे.

सन २०२४ मध्ये लोहारा, उमरगा तालुक्यात प्रचंड प्रमाणात पाऊस झाला होता. त्यामुळे पिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. जिल्हा प्रशासनाने सुरुवातीला ८ ऑक्टोबर रोजी धाराशिव, कळंब, परंडा व वाशी या चार तालुक्यातील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांचा २२१ कोटी ८१ लाख रुपये अतिवृष्टी मदत मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता तो मंजूर होऊन त्याचे बऱ्यापैकी वितरणही झाले आहे. लोहारा उमरगा तालुक्यात उशिराने पाऊस झाल्याने लोहारा उमरगा तालुक्यातील महसूल व कृषी विभागाकडून आलेल्या नुकसानीच्या प्रस्तावानंतर जिल्हा प्रशासनाने १५ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाकडे अतिवृष्टी नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केला.

लोहारा तालुक्यातील २४ हजार ७८० शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख तर उमरगा तालुक्यातील. ४९२२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख मिळणार आहे.

याचा अर्थ लोहारा उमरगा तालुक्यातील ७९ हजार ८८६ शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये मिळणार आहेत. १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाकडून विभागीय आयुक्त कार्यालयाला उमरगा लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान मिळण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठवला आहे. त्यानंतर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून २७ ऑक्टोबरला महसूल व मदत पुनर्वसन खाते मंत्रालय येथे सदरील प्रस्ताव पाठविला असून आत्तापर्यंत मंजुरी अभावी सदरील प्रस्ताव मंत्रालयामध्ये प्रस्ताव प्रलंबित आहे.



राज्य शासनाने २८ फेब्रुवारी रोजी राज्यातील अतिवृष्टी ग्रस्त काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत जाहीर केली. मात्र त्यात लोहारा उमरगा तालुक्यातील अतिवृष्टी प्रस्तावाचा समावेश नाही जानेवारी मध्ये देखील ज्यांनी प्रस्ताव दाखल केले त्यांचे देखील प्रस्ताव मंजूर झालेले आहेत मात्र १५ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावाला अद्याप पर्यंत मंत्रालयातून मंजुरी मिळालेली नाही.

शासनाचे लक्ष वेधून घेऊन लोहारा, उमरगा तालुक्यातील अतिवृष्टी शेतकऱ्यांना आर्थिक मिलाद दिलासा मिळण्यासाठी २९ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा ते एक या दरम्यान लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते आणि जगताप यांनी दिली असून मागणी मान्य न झाल्यास आंदोलन आमचे पूर्ण करणार असल्याचे सांगितले.

उमरगा लोहारा तालुक्यात उशिराने पाऊस झाला हे खरे आहे त्यामुळे स्वाभाविकपणाने जिल्हा प्रशासनाने १५ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केला मात्र त्याला अद्याप मंजुरी नाही इतर जिल्ह्यातील अगदी जानेवारी महिन्यात पाठवलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे मात्र लोहारा उमरगा तालुक्याचा प्रस्ताव अगोदर जाऊन देखील त्याला मंजुरी मिळाली नाही या संदर्भात मंत्रालयात पाठपुरावा करूनही काही हालचाल होत नाही हा एक प्रकारे लोहारा आणि उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यावर अन्याय आहे त्यामुळे आंदोलनाचे हत्यार उपसले आह. मागणी मान्य न झाल्यास पुढील कालखंडात आंदोलन आणखी तीव्र करू मात्र लोहारा उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये चे अतिवृष्टीचे अनुदान मंजूर करून मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्त.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# नांदेडमध्ये इस्लामिक आतंकवादाच्या पुतळ्याचे दहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ एप्रिल-**

कश्मीरमधील पेहलगाम मध्ये इस्लामिक आतंकवाद्यांनी पर्यटकांना धर्म विचारात २८ हिंदू पर्यटकांची नीर्घृण हत्या केली. अमानवीय हत्याकांडाच्या विरोधात विश्व हिंदू परिषद व सकल हिंदू समाजाच्या वतीने आदांलन करत इस्लामिक बातंकवादाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

२२ एप्रिल दुपारी ३ च्या सुमारास कश्मीरमधील पेहलगाम मध्ये धर्म विचारात २८ हिंदू पर्यटकांची नीर्घृण हत्या करण्यात आली. पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्रबिंदू असलेल्या काश्मीर खोऱ्यातील बैसरन घाटीत देशातील वेगवेगळ्यातील भागातून गेलेल्या हिंदू नागरिकांचं रक्त सांडलं. पर्यटकांच्या आक्रोशाने बैसरन घाटी हादरली. अशा पेहलगाम मधील अमानवीय हत्याकांडाच्या विरोधात विश्व हिंदू परिषद व सकल हिंदू समाज नांदेड तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या घटनेच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. हिंदूंच्या तीव्र भावना व्यक्त झाल्या तसेच सरकारने आक्रमक भूमिका घेऊन या इस्लामिक आतंकवाद्यांना धडा शिकवावा यासाठी काही हिंदू कार्यकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. इस्लामिक आतंकवादाचा पुतळा सुद्धा दहन करण्यात आला. आणि शेवटी पेहलगाम मधील इस्लामी आतंकवादी हल्ल्यात ज्या हिंदूंची हत्या करण्यात आली त्यासाठी भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली. या आंदोलनातून हिंदूंचा तीव्र संताप व्यक्त झाला.

# श्री गुरू गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत पदवी वितरण समारंभ

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२४ एप्रिल-**



गुणवत्तापूर्ण, तांत्रिक व मूल्याधिष्ठित शिक्षण देणाऱ्या श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेचा पदवी वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदव्या प्रदान करून त्यांच्या चार वर्षांच्या अथक परिसरमातून मिळालेल्या मूल्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत पदवी वितरण समारंभ प्रसंगी सभागृहात दीपप्रज्वलन करून समारंभाचा औपचारिक प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नियामक मंडळाचे अध्यक्ष मा.सुनीलजी रायठठ्ठा होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सरोज देशपांडे (अवर सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई) व मुख्य अतिथी म्हणून हुशारसिंग साबळे (संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ स्वा.रा.ती.म.विद्यापीठ ) उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, श्रीमती राजश्रीताई हेमंत पाटील, संत बाबा सुखविंदरसिंघजी, डॉ. धर्मपाल डोये, डॉ. जे. व्ही. मेघा (सदस्य, नियामक मंडळ), डॉ. अनिल गोंडे (अधिष्ठाता - शैक्षणिक), प्रा. संजय देठे (अधिष्ठाता-विद्यार्थी कल्याण), डॉ. अभिजित नांदेडकर (अधिष्ठाता-संशोधन व विकास), डॉ. प्रशांत देशमुख (परीक्षा नियंत्रक, एस.जी.जी.एस.), तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समारंभात विविध विभागांतील गुणवंत विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिके प्रदान करण्यात आली. केमिकल विभागातील श्रुती सिंग हीला संस्थेचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार बहाल करण्यात आला. विभागात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या व्यंकटेश सावंत, प्रणव उमाक, मोक्षदा चौधरी, मोझान चौधरी, जयंत मोरे, सायली जोशी, रामान खोनारकर, कल्याणी देशमुख आणि आकाश पवार यांचा विशेष गौरव करण्यात आला. उपस्थित एकूण २२० विद्यार्थ्यांना संगणक, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, केमिकल, प्रोडक्शन, टेक्स्टाईल आणि माहिती तंत्रज्ञान या शाखांमधून अभियांत्रिकी स्नातक व पदवीत्तर पदव्या प्रदान करण्यात आल्या. या कार्यक्रमा दरम्यान काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व संस्थेच्या सकारात्मक वातावरणाचे कौतुक केले.

याप्रसंगी सरोज देशपांडे यांनी आपल्या भाषणात तांत्रिक शिक्षणासोबत मानवीय मूल्यांची जोड अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.यावेळी सुनीलजी रायठठ्ठा यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मागणारे न होता, नोकरी देणारे बना असे प्रेरणादायी आवाहन केले. राजश्रीताई हेमंत पाटील यांनी विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःच्या यशापुरते मर्यादित न राहता, समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा असे मत व्यक्त केले.संत बाबा सुखविंदरसिंघजी यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या . संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी शैक्षणिक धोरणात वेळोवेळी होणारे बदल विद्यार्थ्यांसाठी लाभदायक आसले असले पाहिजे असे धोरण नेहमी विद्यार्थ्यांपुढे ठेवायचे. तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी विद्यापीठाची गौरवशाली परंपरा, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी यावर प्रकाश टाकला.

## संक्षिप्त वृत्त

### बळीरामपुर येथे जागतीक पृथ्वी दिवस साजरा


**नांदेड**-पृथ्वी विज्ञान मंत्रालय भारत सरकार प्रायोजित कै.धुरपतबाई हिरामण तेलंग प्रतिष्ठाण बळीरामपुर नांदेड यांच्या वतीने बळीरामपुर येथे प्रभात फेरी आणि चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धा असे विविध उपक्रम राबवुन विश्व पृथ्वी दिवस साजरा करण्यात आला. जागतिक पृथ्वी दिवस निमित्त कै.धुरपतबाई हिरामण तेलंग प्रतिष्ठाण बळीरामपुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह पर्यंत प्रभात फेरी काढून सोलार एनर्जी या विषयावर इय्यत्ता ५ वी ते १० वी वर्गातील शालेय विध्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते ,प्रथम येणारया स्पर्धकाला ३००० रु , द्वितीय २००० रू, तृतीय ११०० रु,रोख रक्कम व प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात आला.यावेळी विश्व पृथ्वी दिवसानिमित्त सोलार एनर्जी विषयाची जनजागृती करतांना संस्थेचे अध्यक्ष संतोष तेलंग यांनी सोलार एनर्जी म्हणजे काय? सोलार एनर्जी ही सूर्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचा पृथ्वीसाठी एक नैसर्गिक आणि स्वच्छ ऊर्जा स्रोत आहे.घरावर,विहीरीवर सोलार पॅनेल उभे करून सुर्यप्रकाशाचा उपयोग करुन वीज निर्मिती करण्यात येते,शेतातील पिकाला पाणी देता देते,घरामध्ये पाणी गरम करणे, आणि इतर अनेक उपकरण चालवण्यासाठी सोलार एनर्जीचा उपयोग केला जातो. सोलार एनर्जी प्रदुषणमुक्त असल्यामुळे हवामान बदलावर नकारात्मक परिणाम होत नाही असे प्रतिपादन केले.यावेळी संस्थेच्या सचिव अनिता तेलंग,दिपक रेड्डे,साहेबराव वाघमारे,साईप्रसाद जळपतराव,उज्वला वाघमारे,ज्योती वाघमारे, मायादेवी जोगदंड,भिवाजी तेलंग, शिवाजी तेलंग, संतोष फुलारे,जनाबाई फुलारे आदीची प्रमुख उपस्थिती होती, चित्रकला प्रतियोगिता विजेता स्पर्धेचे परिक्षा नियंत्रक दिपक रेडे,पायल वाघमारे यांनी काम पाहिले.

### साई आर्ट इन्स्टिट्यूट किनवट येथे ७ दिवसीय कार्यशाळेचा समारोप

**किनवट**- मालेगाव येथील प्रसिद्ध कला शिक्षक प्रमोद आर्वी यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षी लक्ष्मण वाडगुरे संचलित साई आर्ट इन्स्टिट्यूट किनवट येथे चित्रकला, रेखाचित्रे व रांगोळींच्या ७ दिवशीय कार्यशाळेचा समारोप दिनांक २३ रोजी सायंकाळी ६.०० वा. करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने महिला पालक उपस्थित होते. तर मुलांनी आनंददायी कला शिक्षणाचा आनंद लुटला. या कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी येथील तहसीलदार शारदा चौंडेकर, प्रमुख मार्गदर्शक कला शिक्षक प्रमोद आर्वी तर प्रमुख पाहुणे न. प मुख्याधिकारी अजय कुरवाडे, माजी शिक्षणाधिकारी आनंदराव वाढे, कॉस्मॉपॉलिटन शिक्षण संस्थेचे सचिव पी. व्ही रामतीर्थकर, गिरीश नेम्मानीवार, एन व्ही रामतीर्थकर, न. प अभियंता अशोक भालेराव उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगतामध्ये शारदा चौंडेकर यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांनमध्ये एक सुप्त कला असते. त्याला ओळखून त्यास आकार देणे आवश्यक आहे. इंटरनेटच्या युगात आपण तीन मिनिटांचा व्हिडिओ सुद्धा पूर्ण पाहत नाही परंतु या कलेमुळे विद्यार्थी संयमी बनतो. हेच काम साई आर्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून साक्षी करत असल्याचे मत व्यक्त केले. न. प मुख्याधिकारी अजय कुरवाडे यांनी अतिदुर्गम भागामध्ये अशा प्रकारच्या कलेला योग्य मार्गदर्शन देण्याचे काम होत असल्याने समाधान व्यक्त केले. तर मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करतांना प्रमोद आर्वी म्हणाले की, आज मोबाईलच्या युगात प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्यास आत्मनिर्भर करण्यासाठी चित्रकला, रेखाचित्रे, रांगोळी यांसारख्या कला आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ह्यामुळे विद्यार्थी शांत, संयमी, एकाग्र तर बनतोच परंतु छोट्या छोट्या बारकाव्यांकडे लक्ष देण्याची दृष्टी वाढते. आणि हे सांघिक काम जर चांगल्या पद्धतीने पुर्ण केल्यास विद्यार्थ्यांना मानसिक समाधान पण मिळत असते. दरम्यान माजी शिक्षणाधिकारी आनंदराव वाढे यांनी आपल्या मुलांना जास्तीत आनंददायी शिक्षणासाठी कला शिक्षणावर जोर द्यावा अस मत व्यक्त केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित दर्शवून पालकांनी समाधान व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नांदेड जिल्हा नियोजन समिती सदस्य बाळकृष्ण कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मण वाडगुरे, कांता वाडगुरे, रितल महाजन, तृप्ती अहिरे, मनमथ चिलवंत, निवृत्ती धुळे, शिवाजी पेटेकर यांसह संतोष आगरमोरे, अमोल बेलखेडे, स्नेहा येलमेवाड, तनुश्री जयस्वाल, श्रेया पवार, कोमल क-हाळे, गौरी क-हाळे आदींनी परिश्रम घेतले.

### आज उमरी बंदचे आवाहन

**उमरी** -जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांवर धर्म विचारून गोळीबार केला,या निंदनिय घटनेचा निषेधार्थ



दि . २५ एप्रील रोजी शिवसेनेने उमरी बाजार पेठ बंदचे आवाहन केले आहे. या निवेदनावर शिवसेना तालुकाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, शहर प्रमुख शिवाजी शिंदे, मज्जिद कमेटी नायब सदर एजाज खान, शे.खमर शे.महमद, गूलाब जाधव, शे.मुखिम, साईनाथ सावंत, गजानन श्रीरामवार,कृष्णा कोहिडवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भीम जयंती साजरी करीत असताना कायद्याचे पालन करा: पो.नि. वसंत सप्रे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२४ एप्रिल-**

मुदखेड तहसील कार्यालयातील सभाग्रहात पोलिस ठाणे मुदखेडच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनानिमित्ताने दि.२२ एप्रिल रोजी शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकिला पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलीस निरिक्षक बी. आर. कांबळे, नायब तहसीलदार मारोतराव जगताप, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेस फडसे, महावितरणचे अधिकारी शिंदे, यांच्या प्रमुख उपस्थीतीत शांतता समिती बैठकिला सुरवात करण्यात आली.

पोलीस निरिक्षक वसंत सप्रे यांनी आपल्या मनोगतातून तालुक्यात व शहरात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करीत असतांना कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी जयंती मंडळानी व पदाधिकारी यांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे असे शांतता समिती बैठकीत उपस्थित भीम जयंती मंडळांना सांगितले. बैठकीच्या यशस्वीतेसाठी पोलिस विभागाच्या जिल्हा



विशेष शाखेचे पोहेकॉ किशोर पाटील यांनी परीश्रम घेतले.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांची तर प्रमुख अतिथी म्हणून युवा सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर तारू ,कॉंग्रेस कमिटीचे शहर अध्यक्ष कैलास गोडसे, युवक कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष मुजीब पठाण, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, महावितरणचे सहायक अभियंता शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.आर.कांबळे,

नगरपरिषदेचे लिपिक दिलीप पवार, व्यंकटेश खानसोळे ,अशोक चव्हाण, आदिनाथ पाटील ढगे, पंडितराव चव्हाण, सुनील एडके, राजु चौदंते, निखील चौदंते, मुकेश कांबळे, पंडित झगडे, सुमित सरोदे, बाबू कोलते, यांच्यासह शहर व तालुक्यातील अन्य भीम जयंती मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# सर्वपक्षीय नांदेड बंद मध्ये सहभागी व्हा : राष्ट्रवादी कॉंग्रेस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ एप्रिल-**

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे इस्लामिक आतंकवाद्यांनी धर्म विचारून निष्पाप हिंदू बांधवांच्या अंदाधुंद गोळीबार करून केलेल्या निर्घुण हत्तेच्या निषेधार्थ आज दिनांक २५ एप्रिल रोजी सर्वपक्षीय नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे आणि या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध करावा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर , नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी , नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर , नांदेड महानगर अध्यक्ष जीवनराव घोगरे यांनी केले आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे गेल्या दोन दिवसापूर्वी इस्लामिक आतंकवाद्यांनी धर्म विचारून पर्यटकांवर बेधुंद गोळीबार केला. या गोळीबारात तब्बल २७ पर्यटकांचे बळी गेले आहेत. इस्लामिक आतंकवाद्याकडून हा भारताच्या अस्मितेवर , हिंदुत्वावर आणि लोकशाहीवर हल्ला आहे. या भ्याड हल्ल्याचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत आहे. या अनुषंगाने उद्या दिनांक २५ एप्रिल रोजी सर्वपक्षीय नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदमध्ये सर्व व्यापारी , सर्व असोसिएशन , सर्व शाळा , महाविद्यालये ,ट्युशन , प्रतिष्ठान बंद ठेवून सहभागी व्हावे आणि देशावर होणाऱ्या अशा आतंकवादी हल्ल्यांचा तीव्र निषेध करावा असे आवाहनही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आज नांदेड बंदचे आवाहन

**नांदेड** - जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे इस्लामिक आतंकवाद्यांनी धर्म विचारून निष्पाप हिंदू बांधवांच्या अंदाधुंद गोळीबार करून केलेल्या निर्घुण हत्तेच्या निषेधार्थ आज दिनांक २५ एप्रिल रोजी सर्वपक्षीय नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले आहे.या बंदमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे आणि या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिखली प्राथमिक आरोग्य केंद्राला आ.चिखलीकर यांची दोन एकर जागा दान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ एप्रिल-**

जिह्याच्या पर्यायाने राज्याच्या राजकारणात तगडा जनसंपर्क असलेले लोकप्रतिनिधी अशी ओळख असलेले आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे आपल्या जन्मभूमीचा विकास व्हावा यासाठी सामाजिक दायित्व निभावतात .त्याच्या चिखली या गाव ही त्यांना नेहमीच साथ मिळाली आहे.या गावात जागेअभावी प्राथमिक आरोग्य केंद्र उभे राहून शकले नव्हते पण गावाच्या लगत असलेली स्वतः ची दोन एकर जागा प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दान दिली असून बुधवारी (२३ एप्रिल) त्या जागेचे रजिस्ट्री दानपत्र त्यांनी करून दिले आहे त्यामुळे चिखली (ता. कंधार ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभासरणीचा प्रश्न सुटला आहे.

कंधार तालुक्यातील चिखली हे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची जन्मभूमी. त्यागावात बारावी पर्यन्त शिक्षणाची सोय त्यांनी उभारली आहे. शिवाय गावा लगतच नॅशनल हायवे गेला दळणवळणाची सोय व्हावी म्हणून मुख्य रस्त्याने राष्ट्रीय महामार्गाला गाव रस्त्यानी जोडले आहे आहे. गाव व आजूबाजूच्या खेड्यापाड्यासाठी आरोग्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करून आणले पण जागे अभावी इमारत उभी राहू शकली नव्हती

आमदार प्रताप पाटील यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी चिखली (ता.कंधार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास स्वतःची दोन एकर जागा दान दिली आहे .त्याचे दान पत्र कंधार येथील



रजिस्ट्री ऑफिस मध्ये करण्यात आके ते दस्त नोंदणी जिल्हा आरोग्यअधिकारी संगीता देशमुख व कंधार उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार , यांच्याकडे प्रतिभाताई यांनी सुपूर्त केले .प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी स्वतःची दोन एकर जागा दान दिली म्हणून जागाजिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख यांनी प्रतिभाताई चिखलीकर यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कंधारचे दुय्यम निबंधक सुनील रहाटकर उपस्थित होते.

आपल्या जन्मभूमीसाठी सामाजिक ' दायित्व' निभावत आ प्रतावराव पाटील यांनी स्वतः ची दोन एकर जमीन प्राथमिक आरोग्यकेंद्राला दान दिली त्यामुळे भव्य दवाखाना होण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून चिखली व आजूबाजूच्या वीस पंचवीस खेड्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत .चिखलीवासीयांनी आपल्या भूमीपुत्राला नेहमीच अडीअडचणीत समर्थपणे साथ दिली त्याच भूमिपुत्राने आपल्या गावासाठी सुविधा व्हावी म्हणून दोन एकर जमीन दान दिली व सामाजिक दायित्व स्वीकारले आहे.या निर्णयाचे गावकऱ्यांनी स्वागत केले आहे

# भोकसखेडा ग्राम पंचायतच्या कामात निकृष्ट दर्जाच्या बांधकाम साहित्याचा वापर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.२४ एप्रिल-**

तालुक्यातील भोकसखेडा येथे शासकीय निधीतून केलेल्या कामात दर्जाहीन बांधकाम साहित्यांचा वापर करून सदरील निधी भोकसखेड ग्रामपंचायतच्या कारभाऱ्यांनी व संबंधित यंत्रणेने हडप केली . याबाबत गेल्या नऊ महिन्यापासून प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही या तक्रारीला अर्थपूर्ण व्यवहारापोटी केराची टोपली दाखवण्यात आली असल्याचा आरोप महर्षी वाल्मिक संघाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप मरकंटे यांनी केले आहे.

तालुक्यातील भोकसखेडा ग्रामपंचायतने शासकीय निधीतून सिमेंट रस्ता ,पेवर ब्लॉक व इतर प्रस्तावित कामे हाती घेतली .सदरील कामे शासन नियमाप्रमाणे करणे अपेक्षित होते .मात्र उपरोक्त कामाच्या बांधकामासाठी लेंडी नदीतून अवैधरित्या वाळूची चोरी करून भरड्या वाळूचा अर्थात माती मिश्रित वाळूचा वापर केला गेला. त्यामुळे अशा निकृष्ट वाळूचा वापर केल्यामुळे कामाची गुणवत्ता ढासळली जाते , यासाठी दि. ९ जुलै २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी, बीडिओ, उपविभागीय अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते दिलीप मरकंटे यांनी सदरील बोगस कामांमध्ये सरपंच, ग्रामसेवक, उपसरपंच संबंधित गुत्तेदार व जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अभियंता यांनी संगणमत करून शासकीय निधीचा गैरवापर करून सदरील निधी हडप केली असल्याची तक्रार दाखल केली होती. मात्र संबंधित यंत्रणेने कागदपत्रेचा खेळ करत कोणतीही कारवाई केली जात नसल्यामुळे दि.२४ जानेवारी २०२५ रोजी भोकसखेडा ग्रामपंचायतच कार्यालया समोर अमर उपोषण करण्यात आले. सदरील कामाची चौकशी करण्यात टाळा टाळ केले. या कामी गेल्या नऊ महिन्यापासून प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही चौकशीसाठी दप्तर दिरंगाई, कायदेशीर शिस्तभंग, कर्तव्यात कसूर संबंधित दोषा रोपत्र दाखल करण्यासंदर्भात दि. ११ एप्रिल रोजी विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल करून दि. ३० एप्रिल रोजी भोकसखेडा ग्रामपंचायत कार्यालयापासून देगलूर पंचायत समिती ,तहसील कार्यालय व उपजिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत नागड व दुचाकीवरून काळे झेंडे लावून निषेध व्यक्त करत उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन पुकारणार असा इशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे..

# नांदेड उत्तर भागातील वीज पुरवठा सुरळीत करा : आ. कल्याणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ एप्रिल-**

गेले काही दिवसापासून नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील वीज पुरवठ्याचा खेळखंडोबा सुरू आहे. शेतीसह उद्योग व्यवसायालाही मोठा फटका बसत असल्याने आ. बालाजीराव कल्याणकर यांनी आज महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृहीत बैठक घेतली. कोणत्याही परिस्थितीत वीज ग्राहकांना त्रास झाला नाही पाहिजे . यासाठी प्रभावी उपाययोजना करा आणि वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करा. ग्राहकांना दिलासा द्या अशा सूचना आ. बालाजीराव कल्याणकर यांनी या बैठकीत दिल्या.



यावेळी अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव , कार्यकारी अभियंता विनय घनबहादूर ,कार्यकारी अभियंता चव्हाण , अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रवण कुमार , उपकार्यकारी अभियंता वाघमारे नांदेड ग्रामीण १ उपविभाग, उपकार्यकारी अभियंता देशमुख अर्धापूर उपविभाग. सहाय्यक अभियंता देशमुख तरोडा नाका शाखा, सहाय्यक अभियंता तोटेवाड

सहाय्यक अभियंता उमरीकर , शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंग सिद्धू, माजी नगरसेवक संदीप गाडीवाले , माजी नगरसेवक श्याम कोकाटे , श्याम वानखेडे, किशन देशमुख कल्याणकर आदींची उपस्थिती होती.

महावितरणच्या संबंधित विभागाचा आढावा घेताना आ. बालाजीराव कल्याणकर यांनी अधिकाऱ्यांनाही खडसावले . ग्राहकांशी चांगले वर्तन करा . उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे वीज पुरवठ्याची मागणी जास्त आहे याची जाणीव ठेवून वीज पुरवठा नियमितपणे सुरळीत ठेवा . एखाद्या भागात भार नियमन करावयाचे असल्यास त्याची पूर्वकल्पना त्या भागातील नागरिकांना द्या असे सांगून त्यांनी यावेळी आढावा घेतला . यात १५ ठिकाणचे सबस्टेशन ५ चत चे १० चत करणार. पहिल्या टप्प्यात सांगवी आणि पावडेवाडी ५ चत चे १० चत करण्यात येणार. जंगमवाडी प्रमाणे २२० घत चे पावर हाउस प्रस्तावित असून लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी सूचना केल्या. यशवंत नगर येथील मुख्य लाईनचा प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना केल्या. मंजूर असलेले ५ सबस्टेशन माळजा, नेरली, मरळक, हनुमानगड, देगलूरनाका जागा लवकरात लवकर हस्तांतरित करण्यात यावी. वाढती लोकसंख्या आणि वाढते वीज ग्राहक लक्षात घेऊन दोन्ही तरोड्याच्या शाखा स्वतंत्र करून दोन शाखा करण्यासाठी उचित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात ठिकठिकाणी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा निषेध

## हिंगोली, कळमनुरी, औंढा नागनाथमध्ये नागरिकांधून संताप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ एप्रिल**
जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे हिंदु पर्यटकांवर धर्म विचारून दहशतवाद्यांनी २७ जणांची निर्दयीपणे हत्या केली. या घटनेचा हिंगोली, कळमनुरी आणि औंढा नागनाथ येथे तीव्र निषेध करीत दहशतवाद्यांना कायमचा धडा शिकवा, अशी मागणी करण्यात आली.
शिवसेनेच्यावतीने हिंगोली येथे दि २३ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे भ्याड दहशतवादी हल्लयात मृत्यू पावलेल्या निष्पाप हिंदूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. भ्याड दहशतवादी हल्लयाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी शिवसैनिक, युवा सैनिक महिला आघाडी व इतर अंगीकृत संघटनेच्या सैनिकांनी उपस्थित होते. यावेळी श्रीराम बांगर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख लखन कुरील, दीपक निमोदिया, संजय खंडेलवाल, प्रतीक अग्रवाल, स्वप्निल आप्पा यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कळमनुरी येथील बसस्थानकासमोर दि २४ एप्रिल रोजी शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांच्या नेतृत्वात पहलगाम येथील निष्पाप पर्यटकांना दहशतवाद्यांनी केलेल्या हत्यांचा निषेध करण्यात आला. यावेळी मोर्चात शिवसेनेसह हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी देश के गद्दारो को गोली मारो सालो को, पाकीस्तान मुर्दाबाद च्या घोषणा देण्यात आल्या.
त्यानंतर दहशतवादाच्या प्रतिकात्मक पूतळा जाळण्यात आला. केंद्र शासनाने दहशतवाद्यांचा बिमोड करून पाकीस्तानला कायमचा धडा शिकवावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप पर्यटकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. याप्रसंगी युवासेना जिल्हाध्यक्ष राम कदम, विजय बोंढारे, राजेंद्र शिखरे, रेखा देवकते, शेषराव बोंढारे, अभय सावंत, बबलू पत्की यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.
औंढा नागनाथ व कळमनुरी येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्यावतीने दि २३ एप्रिल रोजी जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, तालुकाध्यक्ष रमेश सानप यांच्यासह राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कँडल मार्च काढून या घटनेचा तीव्र निषेध केला. तसेच मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# अक्षय तृतीयेला बालविवाह केल्यास होणार कारवाई- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ एप्रिल**
येत्या बुधवार (दि.३०) रोजी 'अक्षय्य तृतीया' असून, या दिवशी जिल्ह्यात संभाव्य बाल विवाहाच्या घटना घडू शकतात. ते संभाव्य बालविवाह रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच असे बालविवाह केल्यास कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यंत्रणेला दिले आहेत.
तसेच नागरिकांनी बालविवाह रोखण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०९८ किंवा ११२ यावर माहिती द्यावी, नागरिकांनी सतर्क राहून बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ आणि महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २०२२ लागू करण्यात आला आहे. त्यानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी भागासाठी तर ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तसेच ग्रामीण भागाकरिता अंगणवाडी सेविका व शहरी भागाकरिता पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.
'अक्षय्य तृतीया' या दिवशी हिंगोली जिल्ह्यात बालविवाह होवू शकतात व यास प्रतिबंध म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. त्यानुसार एखाद्या पुरुषाने अल्पवयीन वधूशी विवाह केल्यास त्या पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीचो कैद आणि एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास, संबंधित वर व वधू यांचे आई-वडील किंवा पालक व अन्य नातेवाईक मित्र परिवार, विवाह विधी पार पाडणारे संबंधित व्यक्ती, धार्मिक गुरु, पंडित, काजी, सेवा देणारे, मंडप मालक, फोटोग्राफर, केटरिंग व्यावसायिक, लॉन्स मालक आणि वाजंत्री असे सर्व, ज्यांनी हा बालविवाह घडविण्यास प्रत्यक्षात मदत केली किंवा तो रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत व विवाहात सामील झालेल्या सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो. सोबतच ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर सुध्दा गुन्हा दाखल होऊ शकतो.

# जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्यानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ एप्रिल**
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत जलसंपदा विभागाच्या वतीने आयोजित जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ च्या अनुषंगाने जलसंपदा व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या शेतकरी प्रशिक्षण सभागृहामध्ये आज पीक पध्दती, उत्पादकता वाढ व पाण्याचे नियोजन याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.यावेळी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ अधीक्षक अभियंता हिंगोलीचे पालक अभियंता सुधाकर कचकलवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, तोंडापूर कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव, उगमचे जयाजी पाईकराव यांची प्रमुख उपस्थिती होती.
याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांनी पीक पध्दती, पाण्याचे नियोजन व त्या अनुषंगाने कृषी विभागाशी संबंधित विविध शासकीय योजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना केले.
उगमचे जयाजी पाईकराव यांनी पाणी बचतीबाबत जनजागृतीच्या अनुषंगाने विविध स्तरावर होत असलेल्या लोकसहभागाच्याप्रयत्नाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. अधीक्षक अभियंता सुधाकर कचकलवार यांनी कृषी विभागामार्फत संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यशाळेचा उपयोग शेतकऱ्यांना पीक उत्पादन वाढीस होईल, असे मत व्यक्त केले. तसेच शेतकरी प्रदीपराव देशमुख यांनी ऊस शेतीसाठी अच्छादीत पध्दतीचा वापर केल्यामुळे पाणी बचत होऊन पिकाचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली असल्याचे अनुभव कथन केले.
दुपारच्या सत्रात शास्त्रज्ञ राजेश भालेराव यांनी पीक पध्दती, उत्पादकता वाढ व पाण्याचे नियोजन या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.
या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी पुत्र गजानन गणेश भवर यांची राज्य राखीव पोलीस दलामध्ये निवड झाल्याने सत्कार करण्यात आला. कार्यशाळेस परिसरातील शेतकरी उपस्थित होते.



**हिंगोली- विले पार्ले मुंबई येथील दिगंबर जैन मंदिर उध्वस्त करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांचे निलंबन करून तातडीने जैन मंदिर पुर्ननिर्माण करावे या मागणीसाठी सकल जैन समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी प्रकाशचंद सोनी, मिलींद यंबल, दिपक सावजी, आनंद सातपुते, किशोर दोडल, प्रवीण कंदी, निशांत दोडल आदींची उपस्थिती होती. छाया-सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक प्रणालीत नोंदणी करावी

हिंगोली- महाराष्ट्र शासनाने दि. ११ एप्रिल २०२५ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी 'अँग्री स्टॅक' प्रणालीत नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. शासनाच्या कृषी योजना, अनुदाने आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करणे अत्यावश्यक आहे. ॲग्री स्टॅक प्रणालीवर नोंदणी करुन फार्मर आयडी काढून घेणाऱ्या शेतकऱ्यांनाच शासकीय योजनांचा लाभ मिळणार असल्यामुळे ही नोंदणी प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. नोंदणी प्रक्रियेमध्ये तलाठी, कृषि सहाय्यक व ग्रामसेवक यांची मदत उपलब्ध असून, हे कर्मचारी शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य करतील. या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या जवळच्या सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) केंद्रावर जाऊन अँग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी आणि फार्मर आयडी काढून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

### आयुष्मान व किसान कार्ड शिबीरात मार्गदर्शन

हिंगोली- हिंगोली तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आज आयुष्यमान कार्ड व किसान कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते आयुष्यमान कार्ड व किसान कार्ड काढणाऱ्या शेतकऱ्यांना कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उपस्थित ग्रामस्थांना कृषी, आरोग्य शिक्षण या संदर्भात अडीअडचणी विचारून घेतल्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या योजनाबाबत त्यांना तसेच बचत गटाच्या महिलांना शासनाच्या योजनाची माहिती दिली. तसेच त्यांनी डिग्रस कऱ्हाळे येथील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राला शासकीय गायरानातील जमीन हस्तांतरित करण्यात येईल, असे सांगितले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, गटविकास अधिकारी गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संभाजी कऱ्हाळे, ग्रामविकास अधिकारी श्री. हेलगड, मंडळ अधिकारी, तलाठी, गजानन रणखांब, डॉ.संगीता टारफे, बळीराम पाटील, शिवाजी कऱ्हाळे, रावसाहेब कऱ्हाळे, बळीराम पाटील, अशोक काळे, शैलेश कऱ्हाळे, शिवम कऱ्हाळे, छाया कऱ्हाळे, अंगणवाडी ताई व आशा वर्कर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिंगोलीत तुरीला ६ हजार ६०० रूपये भाव

हिंगोली- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मोंढा यार्डमध्ये गुरूवारी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी तुरी विक्रीसाठी आणल्या होत्या. सुमारे ३०० ते ४०० क्विंटल तुरीची आवक झाली होती. गुरूवारी तुरीला बाजार समितीच्या आवारात ६ हजार ६०० ते ७ हजार २०० रूपये एवढा भाव मिळाला आहे. तुरीला चांगला भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्य समाधान व्यक्त होत आहे. याआधी तुरीला एवढा भाव या हंगामात मिळाला नव्हता. मागील काही दिवसांत हळदीलाही हिंगोली मोंढ्यात चांगला भाव मिळत असून प्रतिक्विंटल १० हजारापेक्षा जास्त भाव मिळत असल्यामुळे हिंगोलीसह परिसरातील शेतकरी संत नामदेव मार्केट यार्डमध्ये वाहनांच्या माध्यमातून हळद विक्रीसाठी आणीत असून सकाळपासूनच वाहनांच्या रांगा लागत आहेत.

# वसमत येथे पाण्यासाठी महिलांचा घागर घेवून आक्रोश मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २४ एप्रिल**
शहरातील विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर बनत चालली आहे.वसमत शहरात मागच्या सहा-सात महिन्यांपासून पाणीपुरवठ्याची समस्या निर्माण झाली आहे. कधी बारा दिवसाला तर कधी १५ दिवसाला पाणीपुरवठा होत आहे.
नगरपालिकेच्या गलथन कारभारामुळे व नियोजनाच्या अभावामुळे वारंवार पाणीपुरवठा हा विस्कळीत होत आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, तर घागर भर पाणी विकत घेण्यासाठी वीस रुपये मोजावे लागत आहे. अशा नगरपालिका प्रशासनाच्या गलथान कारभाराचा निषेध करत वसमत नगर परिषदेवर पाण्याच्या अनियमितते विरोधात गणेश पेठ येथील महिलांनी घागर जन आक्रोश मोर्चा काढून निवेदन दिले. यावेळी युवासेना शहर प्रमुख विनायक सातपुते भाजपा शहर प्रमुख विष्णू भाऊ बोचकरी, बंडू बोबडे, नरेंद्र कमळू, गजानन सातपुते, महेश नांदेडकर, अरुण कमलू, गंगाप्रसाद सातपुते, मोना कमलू अँड.रंगनाथ देशमुखे, रमेश सावजी बावळे, राजेंद्र सातपुते, शिव इंगोले, रामजन्मोत्सव समिती अध्यक्ष संजय टाक, ऋषिकेश कानबाळे, मारोती पेटकर व सर्व गणेश पेठ येथील नागरिक मोठ्या संख्येने महिलावर्ग उपस्थित होते.

# हिंगोलीत ३० एप्रिलला भगवान परशुराम जयंतीनिमित्त महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ एप्रिल**
सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान परशुराम जयंती निमित्ताने समितीची बैठक घेण्यात येऊन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या बैठकीत ३० एप्रिलला भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त महाआरती व ४ मे रोजी हिंगोली शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
हिंगोली शहरामध्ये दरवर्षी सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त धार्मिक कार्यक्रमासह महाआरती व भव्य मिरवणूकीचे आयोजन केले जाते. हिंगोली शहरामध्ये सकल ब्राह्मण समाजातर्फे भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त ३० एप्रिल रोजी हिंगोलीतील गायत्री भवनमध्ये दुपारी १२.३० वाजता भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.
भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्ताने प्रत्येक वर्षी भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार ४ मे रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणूकीत भजनीमंडळ, ढोल ताशा, रथ आदींसह लेझीम पथक सहभागी होणार आहेत. ही मिरवणूक भव्य दिव्य स्वरूपात काढली जाणार आहे. मिरवणूकीत फटाक्यांची भव्य आतिषबाजी देखील करण्यात येणार आहे. ही मिरवणूक हिंगोली शहरातील मंगळवारा बाजार भागामधील श्रीदत्त मंदिरातून निघणार असुन देवगल्ली, मारवाडी गल्ली, कपडा गल्ली, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफीस मार्गे रेल्वे स्टेशन रस्त्यावरून गायत्री भवनमध्ये विर्सजीत होणार आहे. या ठिकाणी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे.
बहूभाषीक समाजातर्फे अध्यक्षपदी राघव खंडेलवाल, तर ब्राह्मण समाजातर्फे अभय प्रभाकर जोशी यांची निवड जाहीर केली. उपाध्यक्षपदी पवन उपाध्याय, संजय मेथेकर, सचिवपदी रजनिश पुरोहीत, नितीन शर्मा, कार्याध्यक्ष आशिष शर्मा, कोषाध्यक्ष संजय मानका व अॅड. पंकज जोशी तसेच मार्गदर्शक म्हणुन सल्लागारपदी सकल ब्राम्हण समाजातर्फे गोविंद खंडेलवाल पहेलवान, ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष सतिषराव विडोळकर, अॅड. आनंद पांडे, अॅड. मिलिंद गांजरे, संदिप कावडे, नितीन घन, श्रीकांत वसुले, संजय देशमुख यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय कराटे तायकांदो चषक विजेत्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ एप्रिल**
संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय ऑल स्टाईल मार्शल आर्टस कराटे तायकांदो चषक-२०२५ स्पर्धेत हिंगोली जिल्ह्याला तिसरे पारितोषिक मिळाले आहे. यानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील गोल्ड मेडल पदक विजेत्यांचा आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.
यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी हिंगोली जिल्ह्याला राज्यस्तरीय ऑल स्टाईल मार्शल आर्टस कराटे तायकांदो चषक-२०२५ स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. आता करिअर करण्यासाठी अनेक क्षेत्र उपलब्ध झाली आहेत. कराटे क्षेत्रात चांगली प्रगती करत फिजिकल फिटनेससाठी ही बाब उपयुक्त आहे. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी निवड केल्यामुळे व्यक्तिमत्व विकास होत आहे. त्यामुळे पालकांचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांच्या हस्ते आज १४ वर्षाखालील वयोगटातील मुली अन्वी हनुमंत भिंगारे (१६ कि.वजनगट) जान्हवी विनोद कुबडे (२० ते २२ कि. वजनगट), वैभवी गजानन नागरे (२२ ते २४ कि. वजनगट), तेजश्री नवनाथ दराडे (१६ ते १८ कि. वजनगट) यांना तसेच १४ वर्षावरील वयोगटातील मुले अर्नव विनोद कुबडे (१८ ते २१ कि. वजनगट), अमेय सुदेश भारतीया (२४ ते २८ कि. वजनगट), तनय विलास चव्हाण (२१ ते २३ कि. वजनगट), तन्मय संजय गुट्टे (२५ ते २७ कि. वजनगट), मुंगसाजी दत्ता खोकले (२९ ते ३२ कि. वजनगट), सुरज भगीरथ कोरडे (२३ ते २५ कि. वजनगट), हासीर शेख (३५ ते ३८ कि. वजनगट), पुष्कराज पंकज पतंगे (३८ ते ४१ कि. वजनगट), साईनाथ दादाराव निलकंठे यांना तर १७ वर्षाखालील वयोगटातील अशराजखान माजीद खान पठाण (३५ कि.वजनगट), युवराज विश्वनाथ दळवे (४५ ते ४८ कि. वजनगट) आणि १९ वर्षाखालील वयोगटातील सहायक प्रशिक्षक शुभम प्रभाकर मुंडे यांचा गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच प्रशिक्षक नवनाथ बांगर यांना हिंगोली जिल्ह्यातील पहिला कोरियन ब्लॅक बेल्ट मिळाल्यामुळे त्यांचाही गौरव जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विजेत्या मुलांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिरक महोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ एप्रिल**
औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त पंडीत दिनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव साजरा करण्यात आला. पंडीत दिनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव कार्यक्रमात विविध विभागांचे अधिकाऱ्यांनी योजनांची माहीती दिली. तसेच नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या. यावेळी गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, सहायक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, उपअभियंता राजू नरवाडे, आरोग्य अधिकारी डॉ गजानन चव्हाण, कृषी अधिकारी सुभाष पाचपुते, संगीता इंगळे आदींची उपस्थिती होती.